सोमवार, ११ जुलै २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक ३५४
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अपात्रतेच्या कारवाईसंदर्भात आज ‘सर्वोच्च’ सुनावणी



**मुंबई :** अपात्रतेची कारवाई रोखण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि समर्थक आमदारांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर सोमवारी (दि. ११) सुनावणी होणार आहे. विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी सुरू केलेली अपात्रतेची कारवाई रोखण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे आणि समर्थक आमदारांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुप्रीम कोर्टात सुनावणी झाल्यानंतर पुढील सुनावणीसाठी ११ जुलै रोजीची तारीख देण्यात आली होती. या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने सर्व पक्षकारांना नोटीस बजावली आहे. न्यायालयाने विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, शिवसेनेचे अजय चौधरी, सुनील प्रभू यांना नोटीस बजावून पाच दिवसांत उत्तर देण्यास सांगितले होते. या सर्व मुद्द्यांवर होणाऱ्या सुनावणीकडे राजकीय पक्षांसह राज्यातील जनतेचे लक्ष लागले आहे.

अंतरंग
आमदार अब्दुल सत्तार यांचे संजय राऊतांना प्रत्युत्तर/२
रायगड जिल्ह्यात दुमदुमला विठूनामाचा गजर/५
भारत-पाक सामना तीन महिने आधीच हाऊसफुल्ल/८

# बा विठ्ठला, जनतेला सुखी-समृद्ध कर

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घातले साकडे | आषाढी एकादशीनिमित्त सपत्नीक केली महापूजा

**पंढरपूर : प्रतिनिधी**

समाजाच्या सर्व घटकांतील लोकांच्या जीवनात सुख व समृद्धी येण्यासाठी राज्यासमोरील कोरोनासह सर्व अडचणी दूर करण्याचे साकडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि. १०) विठ्ठलाचरणी घातले.

आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या पत्नी लता शिंदे यांनी बीड जिल्ह्यातील रुई येथील मानाचे वारकरी मुरली भगवान नवले आणि जिजाबाई मुरली नवले या दाम्पत्यासोबत विठ्ठल-रुक्मिणीची महापूजा केली. महापुजेनंतर विठ्ठल मंदिर समितीच्या वतीने आयोजित मानाच्या वारकऱ्यांच्या सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते.



या कार्यक्रमास मुख्यमंत्र्यांचे कुटुंबीय, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्यासह समितीचे अन्य सदस्य, लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मागील दोन वर्षे कोरोनामुळे आषाढी वारी होऊ शकली नाही. त्यामुळे या वर्षी १० लाखांपेक्षा अधिक वारकरी पंढरपूर येथे विठ्ठलाच्या दर्शनासाठी आलेले आहेत. या सर्व वारकऱ्यांना चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येत आहेत. शासन शेतकरी, वारकरी शेतमजूर व कामगार यांच्यासह राज्यातील प्रत्येक नागरिकाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी या वेळी दिली.

राज्यात यंदा चांगला पाऊस पडल्यास चांगले पीक येऊन शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी येईल. शासन शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.



**पनवेल : आषाढी एकादशीनिमित्त भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षा ठाकूर यांनी रविवारी शहरातील नामदेव शिंपी समाजाच्या विठ्ठल मंदिरात जाऊन पूजा केली व दर्शन घेतले. या वेळी नगरसेवक राजू सोनी, मंदिर समितीचे अध्यक्ष विनायक नाझरे, दिलवेद माळवदे, संजय कजबजे, नागेश हिरवे, सचिन नाझरे, मंदार खुर्द, नरेंद्र कपडेकर, अशोक नाझरे, विजया नाझरे, योगिता मांढरे आदी उपस्थित होते.**

(छाया : चेतन पोपेटा)

# आमदार प्रशांत ठाकूर यांचा खारघरमध्ये रहिवाशांसोबत सुसंवाद

## दुहेरी करप्रश्नी सरकारकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन



(छाया : अक्षय शार्दुल)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघरमधील केंद्रीय विहार संकुलातील रहिवाशांसोबत रविवारी (दि. १०) सुसंवाद साधला. या वेळी त्यांनी पनवेल महापालिकेच्या मालमत्ता करासंदर्भात भूमिका मांडत तो कसा योग्य आहे व तो का भरला पाहिजे हे सांगितले. त्याचबरोबर दुहेरी करातून नागरिकांची सुटका व्हावी यासाठी सरकारकडे पाठपुरावा करण्याची ग्वाही दिली.

खारघरच्या केंद्रीय विहार या रहिवासी संकुलात नवी कार्यकारिणी स्थापन झाली आहे. या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी माजी नगरसेवक गुरूनाथ गायकर यांच्याकडे विविध विषयांसंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट मागितली होती. त्यानुसार रविवारी खेळीमेळीच्या वातावरणात सकारात्मक बैठक झाली. या बैठकीस भाजप खारघर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक प्रवीण



पाटील, हरेश केणी, नगरसेविका हर्षदा उपाध्याय, माजी नगरसेवक गुरूनाथ गायकर, भाजप जिल्हा चिटणीस गीता चौधरी, मंडल सरचिटणीस कीर्ती नवघरे, उपाध्यक्ष दिलीप जाधव, संजय घरत, सोशल मीडिया सहसंयोजक मोना आडवाणी, युवा मोर्चा उपाध्यक्ष अमर उपाध्याय, शैलेंद्र त्रिपाठी, गुप्ता, प्रशांत दुधम, केंद्रीय विहार फेडरेशनचे अध्यक्ष डी. एन. पौनीकर, सचिव सुनील साहु, खजिनदार दीपू सिंह व अन्य पदाधिकारी, सदस्य, रहिवासी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, केंद्रीय विहारमधील पदाधिकाऱ्यांनी पनवेल महापालिकेच्या करासंदर्भात प्रामुख्याने प्रश्न विचारला आहे. दोन विषय त्यांनी मांडले. एक म्हणजे महापालिकेच्या स्थापनेपासून पूर्वलक्षी कर (रेट्रोस्पेक्टिव्ह टॅक्स) लावलेला आहे आणि एलबीटी लावला जातोय याबाबतीत काय? या संदर्भात कायदेशीर प्रयोजन आहे त्या दृष्टिकोनातून जे आवश्यक आहे ते करण्यातून कुणाला सुट मिळू शकत नाही. मी त्यांना सांगितले की, महापालिका म्हणून जर व्यक्तिगत कुणावर अन्याय होत असेल, तर महापालिका स्तरावर जी मदत मिळाली पाहिजे ती मी व माझे सर्व सहकारी मिळून करू. सर्व्हिस चार्जबाबत बऱ्याचशा लोकांमध्ये आहे की डबल टॅक्सेशन होतेय. या संदर्भात पनवेल महापालिकेने एप्रिल २०२१मध्ये ठराव करून राज्य सरकारकडे पाठविलेला होता. **(पान २ वर..)**

## निवडक

### उदयपूर हत्येप्रकरणी आणखी एका आरोपीला अटक

**उदयपूर :** राष्ट्रीय तपास यंत्रणेला (एनआयए) कन्हैयालाल यांच्या हत्याकांडातील सातव्या आरोपीला अटक करण्यात यश मिळाले आहे. आरोपी फरहाद मोहम्मद शेख (३१) याला अटक करण्यात आली. एनआयएने सांगितले की, अटक करण्यात आलेला व्यक्ती रियाझ अटारीचा जवळचा सहकारी होता, जो या प्रकरणातील मुख्य आरोपी आहे आणि त्याने कटात सक्रिय सहभाग घेतला होता. या प्रकरणी यापूर्वी सहा आरोपींना अटक झालेली आहे.

### श्रीलंकेचे राष्ट्रपतीही देणार राजीनामा?

**कोलंबो :** श्रीलंकेतील अराजकता लक्षात घेता पंतप्रधान रनिल विक्रमसिंघे यांनी राजीनाम्याची घोषणा केली. त्यानंतर राष्ट्रपती गोटाबाया राजपक्षे यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे. राजपक्षे हे १३ जुलै रोजी आपल्या राष्ट्रपतिपदाचा राजीनामा देणार असल्याचे वृत्त आहे.

# नामांतराचा मुद्दा हा किमान समान कार्यक्रमाचा भाग नव्हता

## खासदार शरद पवार यांची उद्धव ठाकरेंवर नाराजी

**मुंबई : प्रतिनिधी**

नामांतराचा निर्णय घेणार हे मला माहीत नव्हते. नामांतराच्या निर्णयाबाबत योग्य पद्धतीने माहिती देण्यात आली नाही. औरंगाबाद आणि उस्मानाबाद शहराचे नामांतर करताना सुसंवाद साधला गेला नाही. थेट मंत्रिमंडळात प्रस्ताव मंजूर झाल्यावरच याबाबत समजले. नामांतराच्या मुद्द्यावर हवी तशी चर्चा झाली नाही. नामांतरापेक्षा इतर मूलभूत प्रश्नावर लक्ष देणे गरजेचे होते. नामांतराचा मुद्दा हा किमान समान कार्यक्रमाचा भाग नव्हता, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

एकनाथ शिंदे यांच्यासह समर्थक आमदारांनी बंडखोरी केल्यानंतर राज्यात पराकोटीला गेलेल्या सत्तासंघर्षामुळे उद्धव ठाकरे यांच्यावर मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्याची नामुष्की ओढावली. तत्पूर्वी ठाकरे यांनी शेवटच्या मंत्रिमंडळ बैठकीत औरंगाबादचे नामकरण संभाजीनगर आणि उस्मानाबादचे नामांतर धाराशीव करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी दिली. यानंतर जवळपास एका आठवडाभरानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा खासदार शरद पवार यांनी यावर भाष्य केले असून नामांतराच्या प्रस्तावाबाबत काहीच माहिती नव्हते, असे म्हणत ठाकरेंबद्दल नाराजी व्यक्त केली आहे.

खासदार पवार पुढे म्हणाले की, मध्यावधी निवडणुका लागतील, असे मी म्हणालो नाही. पुढील निवडणुकांसाठी आतापासूनच तयारीला लागा असे सांगितले आहे. सन २०२४मध्ये निवडणूक एकत्र लढवावी अशी मनस्थिती आहे. मविआ म्हणून एकत्र लढावे अशी माझी इच्छा आहे, पण अद्याप एकत्र लढवण्यावर चर्चा झालेली नाही.

एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यानंतर आमच्यात अशी कोणतीही भेट झाली नाही. जो फोटो मधल्या काळात व्हायरल झाला होता तो फोटो दोन वर्षांपूर्वीचा होता. त्या फोटोचा आणि सध्याच्या राजकारणाचा काहीच संबंध नाही. त्यामुळे या प्रकारच्या बातम्या पसरवणे चुकीचे आहे. उगीच एकनाथ शिंदेंची अशी बदनामी करणे योग्य नाही, असे स्पष्ट मतही खासदार पवार यांनी व्यक्त केले.

# पेणमध्ये भरधाव कार थेट तलावात



सुदैवाने जीवितहानी टळली

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर पेण तालुक्यातील खरोशी फाटाजवळ चालकाचे कारवरील नियंत्रण सुटल्याने ही कार तलावात बुडाल्याची घटना रविवारी (दि. १०) घडली. ग्रामस्थांनी तातडीने चालकाचे प्राण वाचविल्याने जीवितहानी टळली.

कल्याणवरून पेणच्या दिशेने येत असलेली कार (एमएच ०५-डीएस ५५०१) चालक भरधाव वेगाने चालवित असताना त्याचे कारवरील नियंत्रण सुटले आणि ही गाडी थेट तलावात जाऊन बुडाली. या वेळी ग्रामस्थांनी प्रसंगावधान राखत तत्काळ तलावात उडी मारून कारचालकाचे प्राण वाचविले.

या घटनेची माहिती मिळताच दादर सागरी पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक कमलाकर भऊड व सहकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन क्रेन टोचनच्या सहाय्याने कार तलावातून बाहेर काढली.

# पेण बेकायदा गर्भपातप्रकरणी दोन फरारी आरोपींना पकडले

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील महिलेच्या बेकायदा गर्भपातप्रकरणी दादर पोलिसांनी दोन फरारी आरोपींना अटक केली आहे. देवता भोईर व विनायक भोईर अशी त्यांची नावे आहेत.




पेण तालुक्यातील जोहे येथील डॉ. शेखर धुमाळ यांच्या दवाखान्यात विवाहित महिलेचा १६ आठवड्यांचा गर्भ सासरच्या मंडळींच्या सांगण्यावरून नष्ट करण्यात आला. यामध्ये या विवाहितेचा मृत्यू झाला होता. या प्रकरणात मृत महिलेचा पती, सासू व डॉ. धुमाळ यांना पोलिसांनी तातडीने अटक केली, पण मृत महिलेची नणंद देवता भोईर व तिचा पती विनायक भोईर हे दोघे फरारी होते. या दोन्ही आरोपींना नागोठणे येथून त्यांच्या मित्राच्या घरातून अटक करण्यात आली आहे.

या प्रकरणातील दोन्ही फरारी आरोपी गुन्हा दाखल झाल्यापासून त्यांच्या राहत्या घरी राहत नव्हते. त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी दोन पथके बनवली होती. दोन्ही आरोपींनी स्वतःकडील मोबाइल बंद करून ठेवले असल्याने त्यांना ट्रॅक करणे कठीण झाले होते. वाशी, वढाव, पेण, मुरूड व रोहा या ठिकाणी आरोपींचा पोलिसांनी शोध घेतला. तपासादरम्यान आरोपी त्याच्या मित्राकडे नागोठणे येथे असल्याची खबर पोलिसांना मिळताच दादर सागरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक गोविंदराव पाटील यांच्या पथकाने तेथून त्यांना अटक केली. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# आषाढी एकादशी-ईदनिमित्त पालीत घडले हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन!

**पाली : प्रतिनिधी**

यंदा हिंदू बांधवांचा आषाढी एकादशी सोहळा आणि मुस्लिम बांधवांचा बकरी ईद सण रविवारी (दि. १०) योगायोगाने एकाच दिवशी आले. यानिमित्त पाली येथे हिंदू-मुस्लिम बांधव ऐक्याचे अनोखे दर्शन घडले. या वेळी मुस्लिम बांधवांनी वारकरी बांधवांना अल्पोपाहाराचे वाटप केले, तर दोन्ही समाजाच्या बांधवांनी एकमेकांना शुभेच्छा देत सामाजिक समतेचा संदेश दिला.

पालीतील हिंदू-मुस्लिम बांधव नेहमीच आपापल्या धर्मातील सण, उत्सव एकत्रित येऊन साजरे करताना दिसतात. प्रेमाने जग जिंकता येते, सर्वधर्मसमभाव जपला



(छाया : धम्मशील सावंत)

व ऐक्यभावना मनात रुजवली, तर आपला देश जगाला हेवा वाटावा अशी प्रगती साधेल, असे मत सुएसोचे उपाध्यक्ष रवींद्र लिमये यांनी या वेळी व्यक्त केले, तर सभापती सुलतान बेनसेकर म्हणाले की, येथील हिंदू-मुस्लिम बांधव नेहमीच एकमेकांचा आदर राखत सण व उत्सव एकोप्याने व शांततेत साजरे करतात. संपूर्ण जिल्ह्याला आदर्शवत ठरावे असे ऐक्य पालीसह सुधागडात दिसून येते. एकमेकांच्या धर्माचा आदर व सन्मान राखण्यातच आपण भारतीय असल्याचा अभिमान व भारतीय संविधानाचा खरा गौरव आहे.

या वेळी चंद्रकांत घायले, श्री. गायकवाड, संतोष कांबळे, बबली शिंदे, सखाराम दिघे, अखिल फणकर, इमदाज पठाण, इजाज पानसरे, इसाक पानसरे, पप्पू परबलकर आदींसह हिंदू-मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकमेकांना शुभेच्छा देत आदरभाव जपला.

# महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ जागतिक दर्जाचे व्हावे

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**नागपूर : प्रतिनिधी**

न्याय विधी क्षेत्रात वैश्विक मान्यता असणारे मनुष्यबळ नागपूर येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठातून तयार होणे आवश्यक आहे. राष्ट्रीय विधी विद्यापीठ त्यासाठी सहाय्यक ठरावे, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. १०) येथे केले. मुला-मुलींचे वसतिगृह व सुविधा केंद्राचे उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते.

नागपूर येथील बुटीबोरी परिसरातील वारंगा येथील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या परिसरात आयोजित या सोहळ्यात सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तसेच या विद्यापीठाचे कुलपती भूषण गवई यांच्या हस्ते मुला-मुलींच्या वेगवेगळ्या वसतिगृहाचे व सुविधा केंद्राचे उद्घाटन झाले. या सोहळ्यास केंद्रीय दळणवळण व महामार्गमंत्री



नितीन गडकरी, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पी. एस. नरसिम्हा, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती सुनील शुक्रे, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अनिल किलोर, कुलगुरू प्रोफेसर डॉ. विजेंद्रकुमार, अधिष्ठाता आशिष दीक्षित उपस्थित होते. त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी आर. विमला, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अतुल चांदूरकर, सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती व्ही. एस. सिरपूरकर, खासदार कृपाल तुमाने, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, आमदार चंद्रशेखर बावनकुळे, आमदार समीर मेघे, राज्याचे माहिती आयुक्त राहुल पांडे यांच्यासह न्याय व विधी क्षेत्रातील मान्यवर तसेच प्रशासनातील वरिष्ठ उपस्थित होते.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री असतानाच्या काळापासून पक्षीय मतभेद सोडून राष्ट्रीय विधी विद्यापीठासाठी काम केले असल्याचे सांगितले. **(पान २ वर..)**

# आपल्याच माणसांनी आमच्यावर वार केले

## ■ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपुरात व्यक्त केली व्यथा

**पंढरपूर : प्रतिनिधी**

आमच्याच माणसांनी आमच्यावर वार केले आहेत, अशी व्यथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंढरपूर दौर्‍यात एका मेळाव्यात बोलताना व्यक्त केली. आज आषाढी एकादशीनिमित्त शिंदे गटाचा हा पहिलाच मेळावा झाला. या मेळाव्यात त्यांनी पंढरपूरच्या विकासासाठी आराखडा तयार करण्याचे काम सुरू असल्याचेही सांगितले. याबरोबरच त्यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, खासदार संजय राऊत यांचे नाव न घेता त्यांनी केलेल्या टिकेचा चांगलाच समाचार घेतला. आमच्यावर टीका करणार्‍यांना आम्ही कामातून उत्तर देणार आहोत असेही ते म्हणाले.

राज्यात सत्तांतरानंतर मुख्मंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यकारभार हाकायला सुरुवात केली आहे. मात्र शिवसेनेकडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या समर्थकांवर जोरदार आरोप सुरुच आहेत. मात्र याला सडेतोड उत्तर मुख्यमंत्री शिंदे आणि त्यांच्या समर्थकांकडून देण्यात येत आहे. दरम्यान, जो काही निर्णय घेण्यात आला आहे, तो हिंदुत्वासाठी घेतला असल्याचे मुख्यमंत्री शिंदे सांगत आहेत. आजदेखील त्यांनी पंढरपुरात सत्तासंघर्षावर विस्तृत भाष्य केले. राज्यात महाविकास आघाडी सरकार असताना शिवसैनिकांना काय मिळाले, असा सवाल त्यांनी केला आहे. तसेच आपल्याच माणसांनी आमच्यावर वार केले. ते आम्ही झेलले, असे म्हणत शिंदे यांनी आपली व्यथा पुन्हा एकदा व्यक्त केली.

**समर्थक आमदारांचे नुकसान होऊ देणार नाही!**

***शिवसेनेच्या ४० आमदारांच्या बंडखोरीवरही त्यांनी भाष्य केले. ही लढाई सोपी नव्हती. आम्ही खूप प्रयत्न केले. ज्या आमदारांनी माझ्यावर विश्वास टाकला त्यांना मी सांगितले आहे की, मी कधीही तुमचे नुकसान होऊ देणार नाही. जेव्हा तुमचे नुकसान होतेय असे वाटेल, तेव्हा सगळी जबाबदारी मी घेईन. अशा प्रसंगात वेळ पडली तर टोकाचे पाऊल उचलेन, असे माझे शब्द होते. लोकांनी मला काहीही विचारले नाही. कुठे चाललोय, कशासाठी चाललोय हे विचारले नाही. लोकांनी माझ्यावर भरभरून विश्वास टाकला. जी गाडी मिळेल त्या गाडीने ते रवाना झाले, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.***



रविवारी पंढरपुरात हजारो, लाखो लोक दाखल झाले होते. प्रत्येकजण हसतमुखाने मला शुभेच्छा देत होता. आशीर्वाद देत होता. पोलिसांनी मला सांगितलं की तुम्ही गाडीच्या बाहेर येऊ नका. पण मला राहवले नाही. मी पोलिसांना सांगितले की, यांच्याकडून मला धोका नाही. ज्यांच्याकडून मला धोका होता, तो टळलेला आहे. आता मला जनतेचे कवच आहे. हे माझे पाठीराखे आहेत. वारकरी संप्रदायक आहे, तो अन्यायाविरुद्ध वार करतो. इथे आपल्याच माणसांनी आमच्यावर अनेक वार केले. ते आम्ही झेलले. मला इतिहासात जायचे नाही. पण पंढरपूरमध्ये मला जे प्रेम मिळाले, ते मी कधीही विसरणार नाही, असे एकनाथ शिंदे म्हणाले. हे वक्तव्य करताना शिंदे यांनी कोणाचेही नाव घेतले नाही, मात्र हा रोख नेमका कोणाकडे होता, याबाबत अनेक तर्क लावले जात होते.

तसेच, बाळासाहेब ठाकरे यांचे हिंदुत्व म्हणजे इतर समाजाचा द्वेश असे आहे का? तर तसे काही नाही. इतर समाज, धर्मांचा आदर राखण्याचे आपले काम आहे, हे बाळासाहेबांनी, दिघे यांनी आम्हाला शिकविले आहे. अशातूनच आपण पुढे जात आहे. कारणमीमांसा शोधण्याऐवजी खालच्या पातळीवर बोलले गेले. काय-काय उपमा देण्यात आली. कामाख्या देवीकडे किती लोक पाठविले? असे विचारण्यात आले. पण कामाख्या देवीने शेवटी काय केले, हे आपल्याला माहिती आहे. आम्ही टीकेवर काहीही बोललो नाही. आम्ही आमच्या कामातून त्यांना उत्तर देणार आहोत. या महाराष्ट्राला सुजलाम् सुफलाम् करुन त्यांना उत्तर देणार आहोत, असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

# संजय राऊतांनी त्यांना मतदानासाठी आम्हाला किती कोटी दिले हे सांगावे



## आमदार अब्दुल सत्तार यांचे खोचक प्रत्युत्तर

**औरंगाबाद : प्रतिनिधी**

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केल्यानंतर महाविकास आघाडी सरकार कोसळले. संबंधित आमदारांनी बंडखोरी करण्यासाठी प्रत्येकी ५० कोटी रुपये घेतल्याचा आरोप शिवसेना प्रवक्ते आणि खासदार संजय राऊत यांनी केला होता. राऊतांच्या या आरोपाला बंडखोर आमदार अब्दुल सत्तार यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. ते औरंगाबाद येथे पत्रकारांशी बोलत होते.

आमदार अब्दुल सत्तार यांनी संजय राऊतांना बोचरा सवाल विचारत म्हटले की, संजय राऊत हे राज्यसभा खासदार आहेत. नुकत्याच झालेल्या राज्यसभा निवडणुकीत शिवसेनेच्या आमदारांनी त्यांना मतदान केले होते. संजय राऊत यांनी त्यांना मतदान करावे म्हणून आम्हाला किती कोटी दिले हे आई-बापाची शपथ घेऊन सांगावे.

मंत्रिमंडळाच्या विस्ताराबाबत विचारले असता आमदार सत्तार म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्लीला गेले होते. शिंदे गटाच्या वाट्याला किती राज्यमंत्रिपदे आणि कॅबिनेट मंत्रिपदे येतात हे पहावे लागेल. त्यानुसार वाटाघाटी आणि पुढील रूपरेषा ठरवली जाऊ शकते. तुम्हाला कोणते पद अपेक्षीत आहे, असे विचारल्यावर त्यांनी म्हटले, आपल्याला कोणतेच पद नको, मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे असावेत एवढीच अपेक्षा आहे. माझ्यासाठी सर्वांत महत्त्वाचे पद हे कार्यकर्ता आहे. राजकारणात पदे येतात आणि जातात, पण मला माझ्या मतदारसंघासाठी काम करायचे आहे. शेतकर्‍यांनी आत्महत्या करू नये यासाठी प्रयत्न करायचे आहेत.

एकनाथ शिंदे मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर चार दिवसांत मला जेवढा निधी मिळाला तेवढा निधी मी माझ्या राजकीय कारकीर्दीत कधीही पाहिला नाही, असेही आमदार सत्तार यांनी सांगितले.

# उरण येथे आषाढी एकादशी सोहळा

**उरण : वार्ताहर**

आषाढी एकदशीनिमित्त उरण तालुका विठ्ठल नामाच्या गजराने दुमदुमला. यावेळी भक्तांनी मंदिरात जात विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेतले.



उरण शहरातीलमोरा कोळीवाडा ग्रामस्त यांच्या वतीने मोरा गावातून पालखी मिरवणूक काढण्यात आली. पुढे भवरा, बोरी नाका, देऊळवाडी ,नागाव येथील अंबिकावाडी व पुढे पिरवाडी समुद्र किनारी सांगता समारोप करण्यात आला. समुद्रकिनारी मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता. उरण तालुक्यातील भेंडखळ या गावी मंदिरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. उरण शहरातील बोरी देऊळवाडी येथे मंदिरात भक्तांनी रांगेत उभे राहुन विठ्ठल रखुमाईचे दर्शन घेतले. मंदिराच्या समोरील बाजूस तुळसीचे हार व फुले, नारळ या पूजेच्या सामुग्रीची दुकाने थाटण्यात आली होती. उरण शहरातील विठ्ठल रखुमाई मंदिरात पहाटे ५ वाजता उरण येथील समाजसेवक जगदीश माळी आणि कुटुंबीय यांच्या वतीने अभिषेक करण्यात आला. दरम्यान, सायंकाळी भजनाचा कार्यक्रम झाला असल्याचे सांगण्यात आले.

# एनडीआरएफचे जवानही झाले आषाढी वारीत सहभागी

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाड परिसरात अतिवृष्टीमुळे निर्माण होणारी पूरस्थिती व दरडी कोसळण्याच्या घटनांमध्ये आपद्ग्रस्तांना मदत करण्यासाठी एनडीआरएफची टीम तैनात आहे. या पथकाने आज आषाढी एकादशीच्या वारीमध्ये सहभाग घेतला आणि आम्ही आपल्या सोबत आहोत असा संदेश महाडकरांना दिला.

महाड आणि परिसरात दरवर्षी पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होते. तसेच दरडी कोसळून मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी होत असते. अशावेळी नागरिकांना मदत करण्यासाठी तेथे कायमस्वरूपी एनडीआरएफचा बेस कॅम्प उभारण्याचा निर्णय गेल्यावर्षी झाला. परंतु अद्याप त्याची पूर्तता झालेली नाही असे असले तरी मागील आठवड्यापासून एनडी आरएफची दोन पथके महाड येथे सज्ज ठेवण्यात आली आहेत. या पथकाने आज आषाढीची वारी केली. महाडच्या संत रोहिदास नगर येथे हे सर्व जवान राहत आहेत. त्यापासून जवळच असलेल्या विठ्ठल मंदिरात रविवारी आषाढी एकादशीनिमित्त झालेल्या कार्यक्रमात हे जवान सहभागी झाले.

ग्यानबा तुकारामाचा गजर करीत ही मंडळी वारीत दंग झाली. त्यांनी दर्शनासाठी आलेल्या भक्तांशी संवाद साधला. कोणताही आपत्ती आली तरी आम्ही आपल्या सेवेसाठी तत्पर आहोत असा विश्वास त्यांनी दिला. विठ्ठल मंदिर संस्थानतर्फे या पथकाचा सत्कार करण्यात आला. पथक प्रमुख निखिल मुधोळकर यांच्या नेतृत्वाखाली बी. महेश, संतोष वारुगुळे आणि पथकातील सहकारी यात सहभागी झाले होते.





# पुन्हा वारीला येण्याचे बळ मिळू दे

## मानाच्या वारकरी सन्मान जिजाबाई नवलेंचे विठ्ठलाला साकडे

**पंढरपूर : प्रतिनिधी**

विठ्ठलाकडे अनेकजण धन, दौलत, जमीन-जुमला आणि दीर्घ आयुष्य मागतात, पण मानाच्या वारकरी ठरलेल्या जिजाबाई नवले यांनी विठुमाऊलीकडे मात्र वेगळेच मागितले. त्या म्हणाल्या, पुढच्या वर्षी वारीला येण्यासाठी विठ्ठला, माझे पाय चांगले राहू दे. यावरुन विठ्ठल-रुक्मिणी प्रती वारकर्‍यांची असलेली मोठी श्रध्दा आहे, हेच पुढे येत आहे.

अधिक वृत्त असे, आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात प्रथेप्रमाणे रविवारी पहाटे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सपत्नीक शासकीय महापूजा पार पडली.

मुख्यमंत्री पदावर विराजमान झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ही पहिलीच महापूजा होती. अनेक वारकर्‍यांच्या उपस्थितीत त्यांनी पत्नी लता यांच्यासह विठूरायाची महापूजा केली.

मुख्यमंत्र्यांसोबत शेतकरी मुरली नवले आणि त्यांच्या पत्नी जिजाबाई नवले यांना महापुजेचा मान मिळाला. मुरली नवले हे गेल्या अनेक वर्षांपासून पायी वारी करत आहेत. खरंतर, विठ्ठलाकडे अनेकजण धन, दौलत, जमीन-जुमला आणि दीर्घ आयुष्य मागतात. पण मानाचा वारकरी ठरलेल्या जिजाबाई यांनी विठुमाऊलीकडे काय मागितले? असे विचारले असता, त्यांनी दिलेले उत्तर वाचून कुणालाही अभिमान वाटेल.

याबाबत त्यांना विचारलं असता त्या म्हणाल्या की, माझे पाय चांगले राहू दे! अशी मागणी केली. म्हणजे पुढच्या वर्षी पुन्हा वारीला मला येता येईल, असे त्या म्हणाल्या.

**नवले कुटुंबाची १९८७पासून वारीची परंपरा**

***जिजाबाई यांचे पती मुरली बबन नवले हे गेल्या ३०-३५ वर्षांपासून म्हणजेच लग्नाआधीपासून वारी करीत आहेत. पण जिजाबाई यांचे हे वारीचं दुसरेच वर्ष आहे. त्यांचे पती मागील १२ वर्षांपासून संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीसोबत पायी चालत विठुरायाच्या दर्शनाला येत आहेत. नवले दाम्पत्य हे बीड जिल्ह्याच्या गेवराई तालुक्यातील रूई येथील रहिवासी आहे. शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय असून मुरली नवले हे १९८७पासून न चुकता वारीला येतात.***

## चित्रपट निर्माते मंगेश देसाईंच्या कारचा अपघात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

चित्रपट निर्माते मंगेश देसाई यांच्या कारचा रविवारी (दि. १०) सायन-पनवेल महामार्गावर कोकण भवन येथे अपघात झाला. देसाई आपल्या कुटुंबीयांसोबत कर्जतला जात होते. समोरच्या गाडीने अचानक ब्रेक मारल्याने हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. सुदैवाने या अपघातात देसाई कुटुंबीयांना कोणतीही दुखापत झाली नसून कारचे मात्र मोठे नुकसान झाले आहे.

समोरच्या कारने अचानक ब्रेक मारल्यामुळे देसाई यांची कार त्या कारवर धडकली. यामध्ये देसाई तसेच त्यांच्या कुटुंबीयांना कोणतीही दुखपात झाली नसून ते सर्व सुखरुप आहेत, तशी माहिती खुद्द मंगेश देसाई यांनी दिली आहे.

# अपघातात गंभीर जखमी झालेल्या जवानाचा उपचारादरम्यान मृत्यू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सैनिक टाकळी ता. शिरोळ येथील जवान दिगंबर कृष्णाजी चव्हाण (२५) कोल्हापूर येथील खासगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. चव्हाण यांचे वडील आजारी असल्याने, ते सुट्टी घेऊन गावी आले होते. गुरुवारी (दि. ७) वडिलांना पाहण्यासाठी जयसिंगपूर येथे गेले असता शिरोळ जयसिंगपूर रस्त्यावर अपघातात ते जखमी झाले होते.



जखमी झालेले चव्हाण यांना प्रथम सांगली येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. पण ते गंभीर असल्याने त्यांच्यावर कोल्हापूर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. दरम्यान शनिवारी त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना घडली. त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यानंतर त्याचे पार्थिव सैनिक टाकळी येथे आणण्यात आले. बेळगावी येथील आर्मी पथकाकडून मानवंदना देऊन शासकीय इतमामात अंत्यविधी करण्यात आला. यावेळी नायब तहसीलदार व अधिकारी उपस्थित होते. दिगंबर कृष्णाजी चव्हाण यांच्या मागे आई, वडील, तीन बहिणी, पत्नी आणि एक मुलगी असा परिवार आहे.

पान १ वरून

## आमदार प्रशांत ठाकूर यांचा खारघरमध्ये रहिवाशांसोबत सुसंवाद

आता ज्या कुठल्या सोसायटीने सर्व्हिस चार्ज भरलाय आणि त्यांना महापालिकेचाही चार्ज लागला आहे त्यावर महापालिकेने ठराव करून पाठविला की, आम्हाला परवानगी द्या, आम्ही त्यांचा सर्व्हिस चार्ज या करातून वळता करू किंवा परत करू. सरकारने त्याला मान्यता दिली, तर महापालिकेला जनतेला दिलासा देता येईल. आता सरकार बदलल्यानंतर या संदर्भात आम्ही पाठपुरावा करू.

येणार्‍या कालावधीत महापालिकेच्या माध्यमातून जास्तीत जास्त सोयीसुविधा मिळाल्या पाहिजेत असा लोकांचा आग्रह आहे आणि निश्चितपणे त्याचा पाठपुरावा आम्ही करू. या बैठकीनंतर पदाधिकारी व रहिवाशांनी समाधान व्यक्त करीत आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार मानले.

## महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ जागतिक दर्जाचे व्हावे

यापुढेही निधीची कमतरता पडू देणार नाही. येणार्‍या पिढीसाठीचे हे काम असून दर्जेदार मनुष्यबळ निर्मितीची बीज पेरणी या माध्यमातून करायची आहे. दर्जेदार मनुष्यबळ व शैक्षणिक सुविधा, आर्थिक विकासाचा मूलमंत्र आहे. ज्या ठिकाणी शैक्षणिक दर्जा उत्तम असतो. त्या ठिकाणी विकास दिसून येतो. या विद्यापीठाच्या विकासाचा पुढील काही वर्षांचा रोडमॅप तयार करा. या विद्यापीठाला पायाभूत सुविधांसाठी यापुढे कर्ज घ्यावे लागणार नाही. शासन भक्कमपणे आपल्या पाठीशी उभे आहे, असे आश्वासनही त्यांनी दिले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर आता एज्युकेशन हब बनत आहे. मिहानमध्ये मोठ्या प्रमाणात आयटी कंपन्या येत आहेत, असे सांगून बुटीबोरी ते कन्हान हा मेट्रो मार्ग सुरू होणार आहे. या मार्गावर विधी विद्यापीठासाठी विशेष थांबा तयार करण्यात येणार असल्याची घोषणा या वेळी केली.


# उरणमध्ये बकरी ईद उत्साहात

**उरण : वार्ताहर**

उरणमध्ये मुस्लिम बांधवांचा बकरी ईद सण उत्साहात झाला. सणानिमित्त एकमेकांना शुभेच्छा देण्यात आल्या.



पोलीस ठाणे हद्दीतील बकरी ईद सणानिमित्त ठिकठिकाणी नमाज पठण कार्यक्रम झाला. दरम्यान, उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ठिकठिकाणी बंदोबस्त ठेण्यात आला होता. उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील पाटील व अधिकारीवर्गाने सर्व मुस्लीम बांधवांना बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या. जामा मस्जिद, उरण येथे सकाळी ७.१५ ते ७.४५ पर्यंत पहिली नमाज पठण झाली. या वेळी सुमारे ७०० ते ८०० मुस्लिम बांधवांनी नमाज अदा केला. दुसर्‍या सदरात सकाळी ८.१५ ते ०८.३० पर्यंत दुसरी नमाज पठण झाली. या वेळी सुमारे ३०० ते ४०० मुस्लिम बांधव होते. खिडकोली नाका येथील मदरसा-ए मेहमुदियामध्ये सकाळी ७ ते ०७.३० पर्यंत पहिली नमाज पठण कार्यक्रम झाला. या वेळी २५० ते २७५ मुस्लिम बांधव होते. खाजा गरीब नवाज सुंनी हनफी, बालई रोड, उरण येथे सकाळी ७.०५ ते ७.२५ वा. पहिली नमाज पठण कार्यक्रम झाला. या वेळी ३०० ते ३५० मुस्लिम बांधव उपस्थित होते. दुसर्‍या सदरात सकाळी ८ ते ८.२५ पर्यंत दुसरी नमाज पठण झाली. या वेळी २५० ते ३०० मुस्लिम बांधव होते.


पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
सोमवार, दि. ११ जुलै २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

■ १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
■ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
■ ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
■ ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
■ ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
■ ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

# खारघरमध्ये विविध कार्यक्रम

## आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

### भाजपतर्फे आषाढी एकादशी उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष खारघर-तळोजा मंडलतर्फे खारघर सेक्टर १२ येथील श्री राम जानकी मंदिरात आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

आयोजित कार्यक्रमांना भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभली. या वेळी आयोजकांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

या मंगलमयसमयी खारघरमधील सर्व भक्तांनी कुटुंबीयासमवेत कार्यक्रमात सहभागी होऊन विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेतले व दिंड्डीचा आनंद घेतला. विद्या ठाकूर मंडळ व भक्ती संगम खारघर यांच्या वतीने भजनाचा कार्यक्रम झाला.

या वेळी भाजप खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक हरेश केणी, प्रवीण पाटील, नगरसेविका हर्षदा उपाध्याय, अनिता पाटील, नेत्रा किरण पाटील, माजी नगरसेवक गुरूनाथ गायकर, भाजप उत्तर रायगड जिल्हा चिटणीस गीता चौधरी, उपाध्यक्ष संध्या शारबिद्रे, मंडल सरचिटणीस कीर्ति नवघरे, उपाध्यक्ष दिलीप जाधव, संजय घरत, सोशल मीडिया सहसंयोजक मोना आडवाणी, महिला मोर्चा सरचिटणीस साधना पवार, सीमा खडकर, गिरीश गुप्ता, मारू काका, युवा मोर्चा उपाध्यक्ष अमर उपाध्याय, हर्षलाताई, शैलेंद्र त्रिपाठी, प्रशांत दुधम आदी उपस्थित होते.







**खारघर : येथील जगन्नाथ मंदिरात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी दर्शन घेतले. या वेळी भाजप मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक हरेश केणी, नगरसेविका हर्षदा उपाध्याय, माजी नगरसेवक गुरूनाथ गायकर, मंडल उपाध्यक्ष दिलीप जाधव, भाजप युवा मोर्चा सरचिटणीस अमर उपाध्याय, गिरीश गुप्ता, भाजप आध्यात्मिक सेलचे शहर संयोजक नवलकुमार मोरे, शैलेंद्र त्रिपाठी, शोभा मिश्रा, अलका सुमन, प्रभा सिंह, जग्गनाथ मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष भगवान पांडा आदी उपस्थित होते.**



**खारघर : सेक्टर ४ भूमी टॉवर येथे अमित गुप्ता यांनी सुरू केलेल्या चायोप्स या चहाच्या दुकानाचे उद्घाटन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी करण्यात आले. या वेळी भाजप मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक हरेश केणी, नगरसेविका हर्षदा उपाध्याय, मंडल उपाध्यक्ष दिलीप जाधव, भाजप युवा मोर्चा सरचिटणीस अमर उपाध्याय, गिरीश गुप्ता, भाजप आध्यात्मिक सेलचे शहर संयोजक नवलकुमार मोरे, शैलेंद्र त्रिपाठी, शिल्पा गुप्ता, क्रिशनकुमार गुप्ता, विनोद गोयल आदी उपस्थित होते.**



**खारघर : आषाढी एकादशीनिमित्त बेलपाडा येथील विठ्ठल-रखुमाई मंदिरात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी दर्शन घेतले. या वेळी भाजप मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक हरेश केणी, शत्रुघ्न काकडे, नगरसेविका हर्षदा उपाध्याय आदी उपस्थित होते.**

# जीएसटी विभागातील सहआयुक्ताला गंडा

## तब्बल ७० लाखांची फसवणूक; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

साठ लाख रुपयांमध्ये रो हाऊस देतो, असे सांगून रो हाऊस बँकेत गहाण ठेवला व ठेवी डिपॉझिट करता १० लाख रुपये घेऊन राज्य वस्तू व सेवा कर (जीएसटी) विभागातील सहआयुक्त रमेश भागूजी जैद (वय ५८) यांची ७० लाखांची फसवणूक झाली आहे. या प्रकरणी जयराम राय यांच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रमेश जैद हे खारघर, सेक्टर ५ येथे राहत असून ते जागेच्या शोधात असताना त्यांची ओळख खारघर परिसरात राहणाऱ्या जयराम भागीरथी राय यांच्यासोबत झाली. ते व्यवसायाने बिल्डर आहेत. या वेळी त्यांनी सेक्टर १२, प्लॉट नंबर इ९७, खारघर येथील घर दाखवले. या रो हाऊस करता एक कोटी वीस लाख एवढ्या रकमेची मागणी केली. त्यांच्यात एक करार झाला. या वेळी रो हाऊसचे इंटरियर करण्याकरता जैद यांनी जयराम यांच्यासोबत रो हाऊसचा तळमजला पाच वर्षांकरिता दहा लाखाच्या हेवी डिपॉझिटवर भाडे करार करून मार्च २०२२ मध्ये घेतला. त्यानंतर जयराम यांनी बिल्डर व्यवसायामध्ये तोटा झाला असून त्यांच्यावर बँकेचे कर्ज असल्याने हे कर्ज फेडण्याकरता ६० लाखाची गरज असल्याचे सांगून रो हाऊसचा ६० लाख रुपयांत व्यवहार करण्यास तयारी दर्शवली.

यानुसार खरेदीची रक्कम ६० लाख व स्टॅम्प ड्युटी आणि रजिस्ट्रेशनचे तीन लाख ९० हजार ८०० अशी एकूण ६३ लाख ९० हजार आठशे रुपये रक्कम स्वतःकडे जमा केली. २६ मार्च रोजी पनवेल रजिस्टर कार्यालयात जाऊन रो हाऊसचे पार्ट पेमेंट डीड केली. त्यानुसार ६० लाख रुपयांना हा फ्लॅट घेण्याचे ठरले. हे साठ लाख रुपये जयराम यांच्या खात्यावर जमा करण्यात आले, तसेच हेवी डिपॉझिट करता दहा लाख रुपयेदेखील जमा केले.

जयराम राय यांनी हा रो हाऊस जीपी पारसिक बँक, कळंबोली येथे गहाण ठेवून त्यावर एक कोटी ८७ लाख एवढ्या रकमेचे कर्ज घेतल्याची जैद यांना माहिती मिळाली. या वेळी बँकेत जाऊन खात्री केली असता रो हाऊस बँकेमध्ये गहाण ठेवल्याचे सांगितले व अधिकची खात्री केली असता रो हाऊसचे पूर्ण कर्ज जोपर्यंत भरले जात नाही तोपर्यंत रो हाऊसची कागदपत्र प्राप्त होणार नसल्याचे बँकेतून सांगण्यात आले. या वेळी जयराम राय यांच्याकडे जाऊन कर्जफेड करून कागदपत्रे द्या, असे सांगितले असता त्याने नकार दिला. त्यामुळे ७० लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी जयराम राय यांच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

# मोबाइल चोरटा गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात मोबाइल चोरी करणाऱ्या दोन सराईत गुन्हेगारांपैकी एका गुन्हेगारास पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शाखेच्या पथकाने गजाआड केले आहे. आरोपीकडून चोरीचा एक मोबाइल फोन हस्तगत करण्यात आला आहे.

पनवेल परिसरातील मिनाक्षी मोबाइल शॉपीमधून आरोपी रोहित दीपक पाटील (वय २४, रा. ठाणे) व पाहिजे आरोपी ऋषिकेश चाचरे (रा. ठाणे) या दोघांनी मिळून मोटरसायकलीवरून येऊन दोन महागडे मोबाइल पळून नेले होते. या यासंदर्भात पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल होताच वरिष्ठ निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, हवालदार रवींद्र राऊत, नाईक परेश म्हात्रे, महेंद्र वायकर, विनोद देशमुख, रवींद्र पारधी, शिपाई विवेक पारासुर व प्रसाद घरत आदींच्या पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास व गुप्त बातमीद्वाराकडून माहिती घेतली असता यातील एक आरोपी हा ठाणे परिसरात लपला आहे.

यानुसार संबंधित परिसरात सापळा रचून आरोपी रोहित पाटील याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून चोरीतील एक मोबाइल हस्तगत करण्यात आला आहे. तर दुसऱ्या फरार आरोपीचा शोध सुरू आहे.



**पनवेल : रायगड जि. प. सदस्य अमित जाधव यांच्या पाठपुराव्यामुळे आदई स्टॉप व वीरपार्क हॉटेल समोरच्या रस्त्यावरील खड्डे भरण्यात आले. या वेळी जि. प. सदस्य अमित जाधव, भाजप सुकापूर अध्यक्ष राजेश पाटील उपस्थित होते.**

# जासई हायस्कूलमध्ये सल्लागार समितीची सभा

## कामगार नेते सुरेश पाटील यांचा सत्कार

**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये चालू शैक्षणिक वर्षाची विद्यालयाची स्कूल कमिटीची व सल्लागार समितीची सभा विद्यालयाचे चेअरमन अरुणशेठ जगे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी कामगार नेते सुरेश पाटील यांची अखिल भारतीय पोर्ट ऑथॉरिटीच्या वेतन सल्लागार सदस्यपदी निवड झाल्याबद्दल, त्यांचा सत्कार करण्यात आला.





सभेमध्ये विद्यालयाचे प्राचार्य व संस्थेचे लाईफ वर्कर यांनी विद्यालयाच्या विकासाच्या सुविधांचा आढावा घेतला, तसेच विद्यालयाच्या अडचणी विषयी चर्चा करण्यात आली. यासोबतच सल्लागार समितीचे सदस्य डी. आर. ठाकूर यांना रायगड भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच दहावी, बारावी कला व विज्ञान विभागात प्रथम तीन आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी सल्लागार समितीचे सदस्य नरेश घरत, अविशेठ पाटील, यशवंत घरत, अमृत ठाकूर, रघुनाथ ठाकूर, बाळासाहेब पाटील, मधुकर पाटील, प्रभाकर मुंबईकर, जे. सी. घरत, हिरामण पाटील आदी उपस्थित होते. शेवटी रयतसेवक संघाचे महाराष्ट्राचे समन्वयक नुरा शेख यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# खारघरच्या सोसायट्यांमध्ये अशुद्ध पाणीपुरवठा

## नगरसेविका संजना कदम यांच्यातर्फे सिडकोला निवेदन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघरमधील काही सोसायट्यांमध्ये होणाऱ्या अशुद्ध पाणीपुरवठ्याबाबत नगरसेविका संजना कदम यांच्या वतीने सिडकोच्या पाणीपुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

सिडकोच्या पाणीपुरवठा विभागाकडून केला जाणारा पाणीपुरवठा हा अशुद्ध असल्यामुळे खारघर सेक्टर १६ व १७ मधील सोसायटीमध्ये राहणाऱ्या नागरिकांना मागील काही दिवसांपासून उलटी व जुलाब होत आहेत. समस्येचे गांभीर्य लक्षात घेता या विषयात लक्ष घालुन योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणी नगरसेविका कदम यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



# ‘दुधे विटेवरी’मध्ये विठूनामाचा गजर

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील नव्याने विकसित होत असलेल्या करंजाडे वसाहत परिसरात दुधे विटेवरी कॉम्प्लेक्समध्ये नुकतेच स्थापन करण्यात आलेल्या विठ्ठल रुक्माई मंदिरात तेथील व परिसरातील रहिवाश्यांनी देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यात आबालवृद्धांनी सहभाग घेतला होता.

या निमित्ताने धार्मिक कार्यक्रमाची सुरुवात पहाटे विठ्ठल-रखुमाई मूर्ती अभिषेकपासून झाली. अभिषेक व पूजेनंतर आरती करण्यात आली. त्यानंतर सोसायटीच्या सर्व धर्मिय लहान मुले आणि मुलींनी विठ्ठलाच्या वारीमध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. सर्व महिलांनी फुगडी आणि रिंगण करून टाळ वाजवून विठ्ठल नामाचा गजर केला. तसेच भजन, हरिपाठ, महाआरती, विठ्ठल भक्तीगीत असे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात दुधे विटेवरी कॉम्प्लेक्सचे बिल्डर आणि सोसायटी कमिटी यांच्यासह करंजाडे व पनवेल शहरातील सर्व भक्तांनी सहभाग घेतला होता.





वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा राम प्रहर

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २७

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. क्रिप्टो करन्सी तयार करताना कोणत्या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो?**

***अ.*** ब्लॉकचेन ***आ.*** मेटा
***इ.*** गुगल ***ई.*** फाईव जी

**२. भारतात टपाल कार्यालयांची एकूण संख्या किती आहे?**

***अ.*** दोन लाख ***आ.*** दीड लाख
***इ.*** एक लाख ***ई.*** चार लाख

**३. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त म्हणजे २०२३ च्या स्वातंत्र्यदिनीकोणत्या ७५ रेल्वेगाड्या सुरु करण्याची घोषणा पंतप्रधानांनी केली आहे?**

***अ.*** राजधानी ***आ.*** तेजस
***इ.*** हमसफर ***ई.*** वंदे भारत




**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई-स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# राज्याला नवी उभारी मिळू दे!

**महाराष्ट्राचा एक सांस्कृतिक व धार्मिक वारसा असलेला पंढरपूरचा आषाढी एकादशी सोहळा रविवारी मोठ्या उत्साहात रंगला. दोन वर्षांनी कोरोना निर्बंध उठल्यानंतर वारी होत असल्याने वारकऱ्यांमध्ये प्रचंड उत्साह होता. त्याचे प्रतिबिंब वारीदरम्यान पहावयास मिळाले होते. अखेर मजल दरमजल करीत लाखो वारकरी पंढरी नगरीत पोहचले आणि अवघा रंग एक झाला. या वेळी समस्त भाविक विठ्ठलचरणी नतमस्तक झाले, तर राज्याचे नवे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही विठूरायाचे दर्शन घेत महाराष्ट्राच्या जनतेला सुख, समृद्धी लाभू दे, असे साकडे घातले.**

महाराष्ट्रात वारीला फार मोठी परंपरा आहे. वर्षभरात निरनिराळ्या वाऱ्या वारकरी असतात. यामध्ये पंढरपूरच्या आषाढी एकादशीच्या वारीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ही वारी म्हणजे महाराष्ट्रातील विविध ठिकाणांपासून सुरू होऊन पंढरपूर येथे संपणारी सामुदायिक पदयात्रा होय. या वारीची परंपरा बरीच जुनी आहे. जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या कुटुंबात वारीची परंपरा होती. संत ज्ञानेश्वर महाराजांचे वडीलही वारीला जात. अनेक संतांनी वारीची परंपरा जतन केली. आज एवढ्या वर्षांनंतरही हा सोहळा अव्याहतपणे सुरू आहे. आळंदी येथून संत ज्ञानेश्वर यांच्या पादुका, देहू येथून संत तुकाराम यांच्या पादुका पालखीत ठेवून ती पालखी रथातून पंढरपूर येथे मार्गस्थ होते. अशाच प्रकारे अन्य संतांच्या पादुकाही पालखीतून पंढरीकडे प्रयाण करतात. 'पंढरीचा वास चंद्रभागे स्नान आणिक दर्शन विठोबाचे' या इच्छेतून वारकरी नित्यनेम वारी करतात. वारकरी संप्रदायात लहान-मोठा, उच्च-नीच असा कोणताही भेदभाव नसतो. वारीतही विविध जातींचे लोक सहभागी होत असतात. विठ्ठलनामाचा गजर करीत टाळ-मृदंगाच्या गजरात वारी निघते. ऊन, वारा, पाऊस अशा कशाचीही तमा न बाळगता वारकरी हे भागवत धर्माची पताका फडकावत पावले टाकतात. यामध्ये महिलाही डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन सहभागी होतात. वारीदरम्यान भजन, कीर्तन, प्रवचन होत असते. सर्वत्र विठूनामाचा गजर होतो. वारकऱ्यांना कधी एकदा पंढरीत पोहचतोय आणि पांडुरंगाचे दर्शन घेतोय याची आस लागलेली असते. आषाढी एकादशीच्या दिवशी मुख्य सोहळा असतो. या दिवशी पंढरपुरात लाखो भाविक जमतात. अशा वेळी सर्वांनाच विठ्ठलाचे दर्शन घेणे शक्य होत नाही. त्यामुळे काही जण मुखदर्शन घेतात. आषाढीला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सपत्नीक विठ्ठलाची महापूजा होत असते. यंदा नवे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व कुटुंबीयांच्या हस्ते शासकीय महापूजा झाली. तसेच प्रथेप्रमाणे दर्शन रांगेत सर्वांत पहिल्या असलेल्या वारकरी दाम्पत्याला पूजेचा मान मिळाला. मुख्यमंत्र्यांनी 'बा विठ्ठला, समाजातील सर्व घटकातील लोकांच्या जीवनात सुख व समृद्धी येण्यासाठी कोरोनासह सर्व अडचणी दूर कर,' असे साकडे विठ्ठलाच्या चरणी घातले. राज्यात यंदा पाऊस उशिराने सुरू झाला आहे. पजर्न्यमानावर शेती आणि बरेच काही अवलंबून असते. त्यामुळे चांगला पाऊस पडणे गरजेचे आहे. ते निसर्गावर अवलंबून आहे, तर अन्य अनेक गोष्टी मानवनिर्मित आहेत. आधीचे मुख्यमंत्री आणि सरकार कुचकामी ठरले असल्याने नव्या शिंदे-फडणवीस सरकारकडून जनतेला खूप अपेक्षा आहेत. त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री जोमाने कामालाही लागले आहेत. जर मनापासून व प्रामाणिकपणे काही करायचे योजले व त्या त्यानुसार पावले टाकली तर भगवंतही साथ देतो. नव्या सरकारच्या माध्यमातून राज्याला नवी उभारी मिळू दे, हीच विठ्ठलाकडे प्रार्थना!

# गोड्या पाण्यातील मासे रोजगाराचे एक दालन!

**खबरबात**
**संतोष पेरणे**

पावसाळा सुरु होताच बाजारात मोठ्या प्रमाणात येणारे मासे कमी कमी होऊ लागतात. एक जून ते १५ ऑगस्टपर्यंत मत्स्य विभागाकडून मासेमारीसाठी पुर्णत: बंदी असते. या मुळे आणि सुरक्षितेच्या दृष्टीने कोळीबांधव आपल्या बोटी किनारी ओढून ठेवत असतात. खरेतर हा कालावधी माशांचा प्रजनन काळ असतो. या मुळे मासे हे कमी पाण्याकडे येत असतात. मासेमारी करणाऱ्या लोकांना याचा फ ायदा होतो. पावसाळ्याच्या दिवसात मोठ्या प्रमाणात गोड्या पाण्यातील मासे बाजारात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतात. विविध प्रकारचे हे मासे त्या-त्या भागांमध्ये विविध नावाने ओळखले जातात. खाण्यासाठी अतिशय चविष्ट असे हे मासे असतात.

खवय्यांनी हे मासे घेण्यासाठी गर्दी होतेच तर दुसरीकडे रोजगाराची मोठी संधी स्थानिकांना मिळून जाते.

पावसाळा सुरु होताच नेरळ मधील बाजारपेठेत गोड्या पाण्यातील मासे मोठ्या प्रमाणात येत आहेत. येथील अंबिका नाक्यावर संध्याकाळी भरणाऱ्या बाजारात गोड्या पाण्यातील मासे खरेदी करण्यासाठी झुंबड उडत असते. दरम्यान, अनेक प्रकारचे चवदार मासे नेरळच्या बाजारपेठेत दाखल झाले असून हे मासे खरेदीसाठी एकच झुंबड उडत आहे. नेरळमधील अंबिकाभुवन नाका आणि नेरळ रेल्वे स्टेशनच्या बाहेर मासे विक्रेते मासे विक्रीसाठी बसलेले असतात. उल्हासनदीच्या पाण्यातून आणि परिसरात असलेल्या धरणामधून मासे पकडून आणले जातात. हे सर्व मासे गोड्या पाण्यातील असल्याने ते मासे खरेदीसाठी खवय्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. सर्व ताजे मासे नेरळ परिसरातील कातकरी आणि मल्हार कोळी लोक सकाळी जाळी लावून मासे पकडतात.

आणि संध्याकाळी विक्रीसाठी नेरळ बाजारपेठेत आणतात. कुंभे येथील कातकरी समाजातील लोकांचा तर हा व्यवसाय नेरळ बाजारपेठेत वर्षभर सुरू असतो. पावसाळ्यात जाळ्यात अडकणारे मासे हे चवदार असतात, या मुळे त्यांची खरेदी करण्यासाठी कल्याणपासून पनवेल पर्यंतचे ग्राहक येत असतात.



पावसाळा सुरू झाला की, माशांच्या पोटामध्ये असलेली अंडी भरलेले मासे खाण्याकडे अधिक कल खवय्यांच्या असतो. हे मासे काही ठराविक काळ सापडत असल्याने त्यांना पकडून आणण्यासाठी कातकरी समाजाचे लोक दिवस रात्र मेहनत करीत असतात. त्यामुळे हे वल्गनीचे मासे पकडून आणण्यासाठी आणि त्यानंतर विक्रीसाठी आणण्याकरिता धडपड असते. ठराविक काळात मिळणारे ते सर्व मासे जास्त चवदार लागत असल्याचे खवय्ये सांगत असतात.

नेरळ बाजार सध्या पावसाळ्यात प्रसिध्द असलेले खेकडे (मुठे), काळी चिंबोरी, माळ्याचे मासे, चिवणी मासे, करावले, मुरी, डाकूमासा, वाम, शिवडे अशा अनेक प्रकारचे मासे विक्रीसाठी ठेवल्याचे दिसत आहेत. संध्याकाळपासून नेरळ व परिसरातील अनेक नागरिक मासे खरेदीसाठी येत असतात. पसंतीनुसार मासे खरेदी करीत असल्याचे दिसून येते. एकतर हे मासे बाजारात या हंगामात उपलब्ध होतात. माश्यांचा सोबतीला खेकडीदेखील बाजारात विक्रीसाठी आल्याने मांसाहारी मंडळी भलतीच खुश आहेत. मासे विक्री व्यवसाय यावरच अनेकांचा उदरनिर्वाह अवलंबून असतो. त्यामुळे मासे खरेदी करणारी मंडळी जास्त जास्त कटकट न करता सांगतील तो भाव देऊन मासे खरेदी करतात. त्यामुळे हे मासे खरेदीसाठी मोठी झुंबड पाहायला मिळत आहे.

वर्षभर ऋतुंमध्ये होणारे बदल हे मानवी आयुष्यात आरोग्य चांगले ठेवण्यासाठी ज्या ज्या वस्तू आपल्या शरीरासाठी आवश्यक असतात. त्यात फळे, मासे, अन्नधान्य यांचा सिझननुसार वापर आपल्या आहारात करणारे लोक आरोग्यवर्धक जीवन जगताना दिसतात. पावसाळ्यात सुरुवातीचे काही दिवस खेकडा जातीचे मुठे हे मांसाहारी खाद्य आरोग्यवर्धक समजले जाते. त्यात जंगलात, शेताच्या बांधावर आणि माळरानावर बिळाबाहेर येणारे गावरान मुठे खरेदी करून खाण्यासाठी खवय्ये विशेष लक्ष देत असतात. दरम्यान, सध्या आरोग्यवर्धक गावरानमुठे बाजारात विक्रीसाठी उपलब्ध असून खवय्यांच्या उड्या पडलेल्या आहेत. सध्या मुठ्यांचा बाजारभाव एक डजनला (१२ मुठे) १०० रुपये असल्यामुळे अनेक जण पकडणे पसंत करतात. मुठे विकून अनेकांच्या हातालादेखील दोन पैसे मिळून जातात. पावसाळ्याच्या सुरुवातीला मिळणाऱ्या या मुठ्यावर खवये तुटून पडतात. मुंबई, पुणे आदी शहरामध्ये राहणारे लोक गावाकडून हमखास मुठे नेतात किंवा आणायला सांगतात. चिंबोऱ्या, खेकडा प्रजातीतील मुठे वर्षातून अगदी काही दिवस जगाच्या संपर्कात येत असतात. वर्षभर जमिनीमध्ये स्वतः खोदलेल्या बिळामध्ये राहून पावसाळा आला की, स्वतःला जगण्यासाठी हिरवागार चारा शोधण्यासाठी बाहेर येत असतात. त्यांचे वास्तव्य जमिनीमध्ये असल्याने त्यांच्यात असलेले गुणधर्म हे आपल्या शरीराच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावत असतात, असे खेकडे अभ्यासक नचिकेत घरत यांनी या दरम्यान बोलताना सांगितले.

**वल्गनी म्हणजे काय?**

उन्हाळ्यात मादी जातीचे मासे आपल्या पोटात प्रजनन अवस्थेत असते. ती मादी या वेळी आपल्या पोटातील पिल्लांना सुरक्षित ठिकाणी जन्म देण्यासाठी पावसाची वाट पाहत असते. पाऊस सुरु झाली की, प्रवाहाच्या विरुध्द दिशेला सरकत मासे नवीन माश्यांना जन्म देतात, यालाच वल्गनी असे ग्रामीण भाषेत नाव आहे. वल्गनी लागली की, मादी मासे हे कमी प्रवाह असलेल्या ठिकाणी सुरक्षित जागा शोधून खोल पाण्यातून बाहेर येते आणि मासेमारी करणारे त्यांची शिकार करतात. त्या माशांच्या पोटातील अंडी म्हणजे गाबोळी होय. ही गाबोळी खाण्यासाठी चविष्ट लागत असल्याने गाबोळी असलेल्या माशांना विशेष मागणी असते.

**सध्या माशांचे प्रकार व दर**

- चिवणी-१५० वाटा
- मळ्याचे मासे-४०० रु. पाव किलो
- करावले-३०० रु. किलो
- मुरी-१००० रु. किलो
- डाकूमासा-३०० रु. किलो
- शिवडे -५०० रु. किलो
- वाम-मोठी-१५० रु. नग

**यावर्षी मासे तुलनेत कमीच**

दरवर्षी पाऊस थोडा थोडा पडत असतो आणि त्यातून लहान नाले हळूहळू भरू लागतात. हे नाले पाण्याने भरत असताना अचानक एक दिवसभर पाऊस पडला की, ते सर्व नाले ओसंडून वाहू लागतात आणि ते पाणी मोठ्या नदीला जाऊन मिळते. त्या नदीतील मासे हे मग लहान नाल्यात, शेतात येत असतात. मात्र यावर्षी सुरुवातीला पाऊस नव्हता, पण ज्यावेळी झाला तेव्हा दोन दिवसात नाले भरून वाहून जात नदीला मिळाले. त्यानंतरदेखील पाऊस थांबण्याचे नाव घेत नव्हता. परिणामी वल्गनी मिळविण्यासाठी तयारी करणाऱ्या हौशी खवय्ये यांची चांगली पंचायत झाली. यावर्षी फार कमी प्रमाणात वलग्नीचे मासे पकडता आले आहेत. त्यामुळे गतवर्षीपेक्षा यावर्षी मासे महाग विकले जात आहेत. सर्व प्रकारचे मासे यावर्षी किमान ८०-१०० रुपयांनी महाग आहेत.

हातात जाळी, पाग घेऊन ग्रामीण भागातील नागरिक शनिवारी व रविवार सुट्टी असल्याने नागरिकांनी वलगणीचे मासेमारी करायला नदी, बंधाऱ्यावर एकच गर्दी केल्याचे दिसून येते. कोरोनाच्या काळात नदी, तलाव बंधारे या ठिकाणी गर्दी करण्यास जिल्हा प्रशासनाकडून मनाई करण्यात आली होती. आता मात्र, कोरोनाचे नियम शिथिल केल्याने ठिकठिकाणी सध्या मोठ्या प्रमाणात मासेमारी सुरू आहे. काहीजण शहरातून गावाकडे मासे पकडण्यासाठी जात आहे.



## बदलते तंत्रज्ञान

### मोबाइल नंबर अपडेट करण्यासाठी या स्टेप्स वापरा

डिजिलॉकर ॲपमध्ये तुम्ही तुमची महत्त्वाची कागदपत्रे डिजिटल स्वरूपात सेव्ह करू शकता. या ॲपमध्ये तुम्ही तुमचे ड्रायव्हिंग लायसन्स, पॅनकार्ड, व्होटर आयडी कार्ड आणि पॉलिसी यासारखी कागदपत्रे सेव्ह करू शकता आणि गरज पडेल तेव्हा वापरू शकता. एकदा तुम्ही डिजिलॉकर उघडल्यानंतर तुम्ही तुमच्या कागदपत्रांऐवजांची एक प्रत इथे अपलोड करू शकता आणि ती सुरक्षितपणे संग्रहित करू शकता. या ॲपमध्ये तुम्हाला तुमचे डॉक्युमेंट स्टोरेजसाठी क्लाउड स्टोरेजदेखील मिळते.

अपलोड केलेल्या दस्तऐवजांची सत्यता तपासण्यासाठी डिजिलॉकरमध्ये संपूर्ण प्रणाली आहे. जेणेकरून युजर्स डिजिलॉकरद्वारे सरकारी संस्थांसोबत ई-डॉक्युमेंट्स शेअर करू शकतील. पण तुम्हाला माहित आहे का की, तुम्ही तुमचा मोबाइलनंबर डिजिलॉकरमध्ये तुम्हाला हवा तेव्हा अपडेट करू शकता. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही तुमच्या आधार क्रमांकाशी लिंक केलेला फोन नंबर डिजिलॉकरशी खात्यासह अपडेट करू शकता. डिजिलॉकर खात्यामध्ये तुम्ही तुमचा नंबर कसा अपडेट करू शकता ते आम्ही तुम्हाला सांगत आहोत.

जाणून घ्या पद्धत-सर्वप्रथम तुमच्या स्मार्टफोनवर डिजिलॉकर ॲप उघडा. नंतर युजर्सचे नाव आणि ६ अंकी सिक्युरिटी कोडसह आपल्या खात्यात साइन इन करा. आता तुमचे लॉगिन डिटेल्स व्हेरिफाय करण्यासाठी तुमच्या डिजिलॉकरशी लिंक केलेल्या फोन नंबरवर एक ओटीपी पाठवला जाईल. यानंतर ओटीपी बॉक्सच्या खाली दिसणाऱ्या अपडेट युवर मोबाइल नंबर या पर्यायावर क्लिक करा. आता तुमच्या आधार लिंक केलेल्या मोबाइल नंबरवर युआयडीएआयने पाठवलेला ओटीची टाका. त्यानंतर नवीन मोबाइल नंबर टाका. आता लॉगिन डिटेल्सचे व्हेरिफीकेशन करण्यासाठी नवीन मोबाइल नंबरवर डिजिलॉकरद्वारे प्राप्त केलेला ओटीपी टाईप करा. यानंतर, तुम्हाला तुमच्या डिजिलॉकर खात्यातील मोबाइल नंबरमधील बदलाबाबत कन्फर्मेशन नोटिफिकेशन मिळेल.




# वाढती लोकसंख्या मोठे आव्हान...

**निमित्त**

जागतिक लोकसंख्या दिन १९९० मध्ये जागतिक लोकसंख्या दिन ९० देशांनी साजरा केला. जागतिक लोकसंख्या दिन हा जगभरात ११ जुलै रोजी साजरा करण्यात येतो. सध्या जगाची लोकसंख्या ही ७.७ अब्ज इतकी असून २०३०मध्ये ती ८.५ अब्ज तर २०५०मध्ये ती ९.७ अब्ज इतकी होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या शतकाच्या अखेरपर्यंत जागतिक लोकसंख्या १०.९ अब्जचा टप्पा पार होईल असा अंदाज आहे. लोकसंख्येचा आकार किती आहे, याचा परिणाम एखाद्या देशाच्या विकासावरही होतो. आशिया आणि आफ्रिका या खंडातील देशांच्या विकासाला वाढत्या लोकसंख्येमुळे आळा बसल्याचाही दावा केला जातो. आपले भविष्य वाचविण्यासाठी लोकसंख्या नियंत्रणात राहणे अतिशय गरजेचे आहे. यासाठी प्रत्येकाने योगदान द्यायला हवे.


हा दिवस असा सुरु झाला-११ जुलै १९८७ रोजी जगातील पाच अब्ज बालक युगोस्लाव्हिया येथे जन्माला आले. त्या निमित्ताने संयुक्त राष्ट्राने याची दखल




घेऊन १९८९ सालापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा करण्याचे ठरवले. युनायटेड नेशन्स जनरल असेंब्लीने डिसेंबर १९९०च्या ४५/२१६ च्या ठरावानुसार जास्त लोकसंख्येच्या परिणामाबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी हा दिवस पाळण्याचा निर्णय घेतला गेला.

वाढत्या जागतिक लोकसंख्येमुळे होणाऱ्या दुष्परिणामांबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी दरवर्षी ११ जुलै रोजी जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी लोकसंख्येच्या संबंधित विषयावर चर्चा केली जाते. तसेच काही कार्यक्रमही आयोजित केले जातात. यामध्ये कुटुंबनियोजन, गरीबी, लैंगिक समानता, मानसिक आरोग्य, नागरी अधिकार आणि इतरही विषयही असतात. जनगणनेसोबत विविध माध्यमांद्वारे लोकसंख्येविषयी डेटा जमवला जातो. उदाहरणार्थ स्त्री-पुरुष संख्येचे गुणोत्तर, जन्मदर, मृत्युदर, आरोग्य आदी विविध सर्व माहितीचा देशाच्या नियोजनासाठी उपयोग होतो.

वाढत्या लोकसंख्येचे दुष्परिणाम-लोकसंख्या वाढल्याने लोक रोजगाराच्या शोधात वेगवेगळ्या शहरांकडे वळू लागले. नोकरीच्या संधी कमी झाल्याने बेरोजगारी वाढूही लागली.परिणामी गरिबीमध्येही झपाट्याने वाढ होऊ लागली. वाढत्या लोकसंख्येमुळे आरोग्याच्या सोयी देखील अपुऱ्या पडू लागल्या आहेत. साथीचे रोग मोठ्या प्रमाणात पसरू लागलेले दिसून येत आहेत. पृथ्वीवर सजीवांचा जन्म आणि विकास झाल्यापासून अलीकडील पाचशे वर्षांपूर्वीपर्यंत निसर्गाचा समतोल राखला गेला, कारण तिथे मानवासारखा निसर्गद्रोही प्राणी जन्मला नव्हता. परंतु मानवाच्या प्रगतीच्या काळापासून लोकसंख्येचे निसर्गाचे गणित चुकले. लोकसंख्या नियंत्रण करण्यासाठी त्वरित पावले उचलली तरच भावी संकट कमी होईल.



**क्लिक...क्लिक...!** **गेले काही दिवस पाऊस सतत सुरू आहे. यामुळे रस्त्यालगत छोटे मोठे धबधबे दिसून येत आहेत. ताम्हीणी घाटात रस्त्यालगत धबधब्याचा आनंद घेताना पर्यटक.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

### मुलांना खोकला, ताप येतोय.. काळजी घ्या!

कोरोनामुळे मागील दोन वर्षं शाळा बंद होत्या. त्यामुळे नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासून शाळांकडून खबरदारी घेतली जात आहे. मुले आजारी असल्यास शाळेत पाठवू नका, अशा सूचना पालकांना देण्यात आल्या आहेत. परंतु, सध्या पावसाळा व वातावरणातील बदलामुळे विषाणूजन्य आजारांचे प्रमाण वाढू लागले आहे. परिणामी, शाळेत शिक्षकांसह विद्यार्थ्यांनादेखील थंडीताप, सर्दी, खोकला, अंगदुखी, घशात खवखव होणे, पोट दुखणे, मळमळणे, जुलाब असे त्रास जाणवत आहेत. त्यामुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.



शासकीय व अनुदानित शाळांमधील मुलांना शालेय पोषण आहार दिला जातो. याअंतर्गत पुरविले जाणारे पदार्थ बहुतांश ठिकाणी सकाळी बनविले जातात. काही वेळा विद्यार्थी हे अन्न डब्यात ठेवून दुपारी खातात. पावसाळ्यात अन्न खराब होण्याची शक्यता असते. बंद डब्यात ठेवलेल्या या अन्नामुळे मुलांचे आरोग्य बिघडू शकते. त्यामुळे बचत गटांनी खिचडी भातासारखा शिजवलेला ओलसर पदार्थ देण्याऐवजी कोरडा आहार द्यावा, अशा सूचना होऊ लागल्या आहेत. या मुळे मुलांचे आरोग्य पावसाळ्यातदेखील चांगले राहू शकते. सध्या मुले एकत्रितपणे एका स्कूलबस, व्हॅनमध्ये शाळेला येत-जात आहेत. त्यामुळे कोरोनाशी साधर्म्य असलेली लक्षणे मुलांमध्ये दिसत आहेत. मुले आजारी असल्यास पूर्ण बरे वाटेपर्यंत शाळेत पाठवू नका, तसेच पालकांनी मुलांची योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन शाळांकडून केले जात आहे. दरम्यान मुलांना जेवणाच्या डब्यात कोरडा आहार द्यावा. डब्यात ताजे अन्न व बाटलीत उकळलेले पाणी द्यावे. पावसापासून संरक्षणासाठी छत्री, रेनकोट सोबत द्यावा. आजारी असल्यास शाळेत पाठवू नये. घरीच उपचार न करता डॉक्टरांकडे घेऊन जावे. पोटदुखी, अतिसार झाल्यास ओआरएस किंवा मीठ साखर पाणी, नारळपाणी द्यावे. सध्या सर्दी, ताप, खोकला, पोटदुखी, जुलाब, उलट्या, मळमळ होणे अशी लक्षणे असणाऱ्या मुलांचे प्रमाण वाढले आहे. कोरोना आणि फ्लूची लक्षणे सारखीच असल्याने विषाणुजन्य आजारांचे औषधोपचार मुलांना दिले जात आहेत. बहुतांश आजार हे दूषित पाणी, दूषित अन्न व हवेतून होतात. यामुळे मुलांची काळजी घ्यावी असे बालरोगतज्ज्ञ डॉ. मंजूषा अशोक शेरकर यांनी सांगितले आहे.

# रायगड जिल्ह्यात दुमदुमला विठूनामाचा गजर

## आषाढी एकादशी भक्तिमय वातावरणात साजरी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात आषाढी एकादशी भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. प्रतिपंढरी समजल्या जाणार्‍या साजगावच्या विठोबा मंदिरासह अलिबाग तालुक्यातील वरसोली येथील विठ्ठल मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी अलोट गर्दी केली होती.

कोरोनाच्या नियम आणि अटींमुळे दोन वर्षे आषाढी साधेपणाने साजरी झाली. यंदा मात्र आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात आणि तितक्याच भक्तिमय वातावरणात साजरी झाली.

अलिबाग तालुक्यातील वरसोली येथील विठ्ठल मंदिरात परिसरातील झिराड, बोडणी व इतर गावातून दिंड्या आल्या होत्या. सकाळी मंदिरात धार्मिक विधी पार पडल्यानंतर मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले. पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. बोडणी आणि झिराड येथून दरवर्षी वरसोलीच्या विठोबा मंदिरात भाविक दिंडीने येतात. यावर्षीही देखील त्यांनीही परंपरा कायम ठेवली. पहाटेलाच निघालेली ही दिंडी दुपारी मंदिरात पोहचली.

शहरातील जागळेकर नाका येथील विठ्ठल मंदिरातदेखील भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. त्याबरोबरच कोळीवाड्यातील मंदिरात विठोबाचे दर्शन घेतले. ठिकठिकाणी आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.





## धाकटी पंढरीत भक्त विठ्ठलचरणी लीन

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

धाकटी पंढरी म्हणून कोकणासह संपूर्ण महाराष्ट्रात नावाजलेल्या खोपोली साजगाव येथील ताकई विठ्ठल-रखुमाई मंदिरात महापुजा करण्याचा मान ताकई ग्रामस्थ डॉ. हेमंत पाटील आणि पत्नी डॉ. रोहिणी पाटील यांच्यासह डॉ. निकेत पाटील, कल्याणी कुलदिपक शेंडे यांच्यासह कुटूंबाला मिळाला.

पंढरपूरनंतर भाविक साजगाव येथे दर्शन घेत असतात. दर्शनासाठी भाविकांची मोठी रांग लागली होती, तर तालुक्यातील अनेक भागातून पायी दिंड्या साजगाव मंदिरात आल्याचे देवस्थान समितीचे सदस्य जयवंत पाटील यांनी सांगितले. संत तुकाराम महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या धाकटी पंढरी ताकई मंदिरास पंढरपूर क्षेत्राएवढेच महत्त्व आहे. कार्तिकी व आषाढी एकादशीनिमित्ताने कोकणातील वारकर्‍यांसह खोपोलीतील ज्येष्ठ नागरिक, हास्यक्लब आणि वर्धमान, सहकार नगर येथील पायी दिंड्या आल्या होत्या. विठ्ठल भक्तांनी कुटूंबासोबत पायी वारी करीत पांडुरंगाचे चरणी लीन होत होतात.



भक्तांची गर्दी होऊ नये यासाठी विठोबा देवस्थान कमिटीचे अध्यक्ष अनंता पाटील, सेक्रेटरी नारायण पाटील, उपाध्यक्ष जयवंत पाटील, सदस्य ॲड. रामदास पाटील, संजय पाटील यांच्यासह सर्व सदस्यांनी सकाळपासून नियोजन केले होते. खोपोली पोलीस निरीक्षक शिरिष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## कर्जत तालुक्यात आषाढी एकादशी उत्साहात

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यात सुमारे ५० गावांमध्ये अखंड हरिनाम सप्ताहाचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. आषाढी आणि कार्तिकी एकादशीला या बहुसंख्य गावातील ग्रामस्थ पंढरपूर आणि आळंदीला जात असतात. यंदा चांगला पाऊस पडत असल्याने शेतकरी वर्ग समाधानी आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही शाळांमध्ये दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

शाळांमधील लहानगे विद्यार्थी संतांचे गणवेश परिधान करून टाळ धरीत कपालेश्वर मंदिरातील विठ्ठल-रखुमाई मंदिरात आले आणि त्यांनी हरिनामाचा गजर केला.




दोन वर्षे कोरोनाच्या संकटात चिमुरड्यांची दिंडी निघाली नव्हती, म्हणून यंदा वेगळाच उत्साह त्यांच्यामध्ये होता.

शहरातील विठ्ठल मंदिरातील पुजेचा मान मधुरा चंदन आणि महेंद्र चंदन या उभयतांना मिळाला होता. पहाटे त्यांच्याकडून पुरोहित जनार्दन परांजपे यांनी षोडोपचार पूजा करून घेतली. शिशूमंदिर, विद्याविकास मंदिर, शारदा मंदिराच्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांच्या दिंडीचे आयोजन करण्यात आले. या वेळी शिक्षिकांनीसुद्धा टाळ धरला होता. दहिवलीच्या पुरातन विठ्ठल मंदिरात असंख्य भाविकांनी विठ्ठल- रखुमाईचे दर्शन घेतले. दिवसभर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

## 'बार्टी'कडून संविधान दिंडी

**मुरुड जंजिरा : प्रतिनिधी**

मुरूड येथील नवीवाडी येथे बार्टी व रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा शिघ्रे यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशीनिमित्त वारकरी दिंडी व संविधान दिंडी काढण्यात आली.

या वेळी मुख्याध्यापक शिवप्रसाद रोडगे, सुरेखा बोऱ्हाडे, अर्चना मोरे, रविंद्र काकडे, वैशाली पेरवे (खरपडे) व सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते.

वारकरी संप्रदाय हा जगाला सहिष्णुता बंधुता शिकवणारे संप्रदाय आहे आणि हेच बंधुभाव, एकात्मता, न्याय स्वतंत्रता भारत देशातील प्रत्येक नागरिकांला संविधानामुळे मिळाले आहे, परंतु देशातील बहुसंख्य लोकांना याची जाणीव नाही आणि ही जाणीव होण्यासाठी बार्टीकडून संविधान दिंडीच्या माध्यमातून संविधान देशातील तळागळातील नागरिकांपर्यंत पोहचवले जात आहे. संविधान देशातील घराघरात पोहचावे हाच मुख्य उद्देश घेऊन सदरची दिंडी काढून जनजागृती करण्यात आली.



## पेणमध्ये विठ्ठलनामाची शाळा भरली

**पेण : प्रतिनिधी**

पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळेत दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. विठूरायाच्या नामाचा जयघोष करीत टाळ, हातात भगव्या पताका घेऊन बच्चे कंपनीने आषाढी एकादशीनिमित्त दिंडी काढून आनंद साजरा केला.

पेण एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष ॲड. बापूसाहेब नेने, मुख्याध्यापिका लेखा ठाकूर यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. या वेळी शाळेतील शिक्षिका अपर्णा वाघमारे, सुषमा साखरे, कविता पेडणेकर, गीता म्हात्रे, रुपाली पाटील, कमला पाटील, रुचा परांजपे, शिक्षक मिलिंद वारगुडे, धनाजी घरत, लिपिक गंगाधर गायकवाड आदींसह कर्मचारी पालक संघाचे सदस्य, माता पालक संघाचे सदस्य व पालक वर्ग उपस्थित होते.



विठ्ठल-रखुमाई, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत बहिणाबाई, संत मुक्ताबाई या संतांची वेशभूषा करून टाळ वाजवत राम कृष्ण हरीच्या गजरात व हरिनामाचा जप करीत शाळकरी मुले दिंडीत रमलेली दिसली. मुलींनी साडी परिधान डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन तसेच फुगड्या घालत निघालेल्या या दिंडी सोहळ्यामुळे वातावरण भक्तिमय झाले होते. शाळेपासून निघालेली दिंडी महात्मा गांधी मंदिर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा समोरून फेरी मारून पुन्हा शाळेत परत आणण्यात आली. अनेक भाविकांनी दिंडीचे स्वागत केले.

## आषाढी एकादशीनिमित्त संगीत भजन कार्यक्रम

**मुरुड जंजिरा : प्रतिनिधी**

मजगाव येथील आगरी समाजाच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त रविवारी (दि. १०) संगीत भजन सोहळा विठ्ठल मंदिरात ठेवण्यात आला होता.



या वेळी गुरुवर्य भगवान लोकरे यांचे शिष्य बुवा श्री शंकर रामचंद्र राऊत यांच्या सुमधूर आवाजात विठ्ठलाचे विविध अभंग, भारुड, गवळणी, रूपक सादर करण्यात आले. सदरील कार्यक्रमासाठी मजगाव गावातील अनेक महिला व ग्रामस्थांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. या वेळी विठ्ठलाची दिंडीसुद्धा काढण्यात आली होती. त्यांना साथसंगत म्हणून पखवाज वादक केशव महादेव राऊत तसेच सागर राऊत यांनी केले, तसेच प्रकाश राऊत यांनी उत्कृष्ट टाळ व चकवा वादन केले. उत्कृष्ट कोरस आणि झांज वाजवून जनार्दन मोरे यांनी प्रेक्षकांची मन जिंकली. भक्तिमय वातावरणात विठ्ठलाचे नामस्मरण करून सर्व ग्रामस्थांनी आषाढी एकादशी उत्साहात साजरी केली.

## ओंकार विद्यामंदिरात बालवैष्णवांची दिंडी

**मुरूड : प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराप्रमाणे मुरूड तालुक्यातील विठ्ठल मंदिरदेखील उजळून निघाले होते.

शालेय जीवनात विठ्ठलाच्या वारीचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी तसेच भक्तीमार्गाचा संस्कार बालमनावर रुजविण्यासाठी मुरूड येथील हिंदू एज्युकेशन सोसायटी संचलित ओंकार बालवाडी व ओंकार विद्यामंदिर येथील सुमारे ३००हून अधिक चिरमुरड्यांनी वारकरी वेशात पददिंडी काढून विठूरायाचा जयजयकार करीत, पताका मिरवित आनंद घेतला.

कोरोनामुळे दोन वर्षे वारकरी दिंडी स्थगित करण्यात आली होती, मात्र यंदा पालक, शिक्षकांचा प्रतिसाद विद्यार्थ्यांइतकाच उत्स्फूर्त होता.





## श्रीराम मंडळातर्फे आषाढी एकादशीनिमित्त वृक्षारोपण

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा येथील श्रीराम सांस्कृतिक, सामाजिक, क्रीडा मंडळातर्फे पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून, आझादी का अमृत महोत्सव या राष्ट्रीय कार्यक्रमाचे औचित्य लक्षात घेऊन रविवारी (दि. १०) आषाढी एकादशीच्या दिवशी म्हसळा येथील पुरातन श्री लखमेश्वर मंदिर आणि म्हसळा शहरवासीयांचे ग्रामदैवत असलेल्या श्री धाविर मंदिराच्या परिसरात कडुनिंब, बेल, चाफा, बदाम, प्राजक्ता, शमी, वड आणि विविध फुलझाडे अशा सुमारे ७५ रोपांची लागवड करण्यात आली.

या वेळी मंडाळचे अध्यक्ष सौरभ पोतदार, उपाध्यक्ष महेंद्र करडे, पर्यावरण प्रेमी पितापुत्र गौरव, अनुज पोतदार, मंडळाचे माजी उपाध्यक्ष प्रसाद पोतदार, हिंदू ग्रामस्थ मंडळाचे सदस्य दिलीप पानसरे, त्वष्टा कासार समाज अध्यक्ष भालचंद्र करडे, राजेश करडे, कौस्तुभ करडे व इतर सदस्य उपस्थित होते. मंडळाच्या सर्व सदस्यांचे विविध गटात विभाजन करण्यात झाडांची रोपे दत्तक देण्यात आली.



## मुरूडमधील विठ्ठल मंदिरात गर्दी

**मुरूड : प्रतिनिधी**

कोरोनामुळे दोन वर्षांपासून विस्कळीत झालेले जनजीवन सुरळीत होत असल्याने उत्सवांमध्ये उत्साह जाणवत आहे. वर्षभरातील २४ एकादशींमध्ये आषाढी एकादशीचे वेगळे महत्त्व आहे. आषाढी एकादशी म्हटले की, डोळ्यासमोर येते ती पंढरपूर वारी. या दिवशी हजारोंच्या संख्येने भक्त विठ्ठलाच्या चरणी लीन होतात. मुरूड तालुक्यातील हजारो विठ्ठल भक्तांनी विठूरायाचा जप करीत जुनीपेठ येथील श्री काळभैरव विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली होती.

श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या पुजेला पहाटे सुरुवात झाली. दुग्धाभिषेक आणि विविध लेप लावून विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तीला स्नान घालण्यात आले. तुळशीहार आणि फुलांच्या माळांनी विठुरायाला सजवण्यात आले. खास दागिने आणि वस्त्र घालून विठ्ठल-रुक्मिणीची पूजा झाली. या पुजेचा मान कुंभारवाड्यातील दिनेश भोईर व त्यांच्या पत्नी रंजना भोईर यांना मिळाला. पहाटे काकड आरती व महापुजा आरती झाल्यानंतर मंदिर सर्वांसाठी खुले राहणार आहे. पंचक्रोशी भागातील एकमेव मंदिर असल्यामुळे विठ्ठलाच्या ओढीने टाळ-मृदंगाच्या तालावर विठूरायाचा जयघोष करीत विठ्ठलच्या चरणी नसमस्तक झाले. विठ्ठल भक्तांसाठी तिर्थ-प्रसादाचे आयोजन मंदिर समितीकडून करण्यात आले.





## रेवदंड्यातील मंदिरात कार्यक्रम

**रेवदंडा : रामप्रहर वृत्त**

येथील विठ्ठल मंदिरात भाविकांनी एकादशीनिमित्त दर्शनासाठी गर्दी केली होती. मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

मंदिरात आकर्षक रोषणाई करण्यात आली होती, तसेच फुलांची सजावट केली होती. उपवासाचे पदार्थ उपहारगृहात खरेदी करताना ग्राहक दिसत होते. विविध फळे बाजारात दाखल झालेली असली तरी भाव वधारले होते. अनेक विद्यालयात शनिवारी दिंडी काढण्यात आल्या होत्या.



## संत सेवा मंडळातर्फे पालखी दिंडी

**पेण : रामप्रहर वृत्त**

आषाढी एकादशीनिमित्त संत सेवा मंडळातर्फे दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. दिंडी पालखी महात्मा गांधी वाचनालय व ग्रंथालय येथे आल्यावर संस्थेचे अध्यक्ष अरविंद वनगे, उपाध्यक्ष अशोक देसाई, कार्याध्यक्ष आप्पा सत्वे, कार्यवाह सपना पाटील यांनी दिंडीचे पालखीचे वारकऱ्यांचे स्वागत केले.

त्यानंतर दर्शना आखाडे या विद्यार्थिनीने इयत्ता १०वीमध्ये ८२.४० टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाल्याबद्दल तिचा सत्कार हृदयरोग तज्ज्ञ डॉ. महानंदा म्हात्रे यांच्या हस्ते सन्मानपत्र श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

संस्थेच्या कार्यवाहक सपना पाटील यांची कन्या रिद्धी हिने एसएससी परीक्षेत ९५ टक्के गुण मिळविले म्हणून तिचाही सत्कार डॉ. महानंदा म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आला. आदिवासी कार्यकर्त्या वैशाली पाटील यांनी दोघींना १००१ रुपयांचा धनादेश दिला.

कार्यक्रमाची सुरुवात हरीश पाटील यांच्या अभंगाने करण्यात आली. हरीश पाटील व त्यांना पेटीवर साथ देणारे सुभाष वनगे, तबला साथ देणारे बल्लाळ ढवळे, यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महात्मा गांधी ग्रंथालय वाचनालयाच्या कार्यवाहक सपना पाटील यांनी अत्यंत बहारदार केले.

# मोरबे धरणाच्या पाणी पातळीत वाढ

## मागील चार दिवसांतील संततधार पर्जन्यवृष्टीमुळे दिलासा

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वत:च्या मालकीच्या मोरबे धरण प्रकल्पामुळे जलसमृध्द शहर अशी नवी मुंबईची ओळख आहे. यावर्षी खूप उशीरा पावसाळी कालावधी सुरू झाल्याने काही शहरांनी पाणी कपातीचा निर्णय घेतला होता, मात्र नवी मुंबई महानगरपालिकेने असा निर्णय न घेता नागरिकांना दिलासा दिला होता. त्याच वेळी इतर शहरातील पाणी टंचाई लक्षात घेता पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहनही महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या वतीने नागरिकांना करण्यात आले होते.



नवी मुंबईकर नागरिकांना पाणी पुरवठा करणाऱ्या महानगरपालिकेच्या मोरबे धरण प्रकल्पात ३ तारखेला २७.३४ टक्के म्हणजेच ३१ ऑगस्टपर्यंत पुरेल इतका जलसाठा होता. ४ जुलैपासून मोरबे धरण पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडण्यास सुरुवात झाल्याने जलसाठ्यात झपाट्याने वाढ झाली. ४ तारखेपासून ८ तारखेपर्यंत पाच दिवसांत ६०६.८० मि.मि. इतक्या मोठ्या प्रमाणावर पर्जन्यवृष्टी झाल्याने मोरबे धरणाच्या पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाली असून ५२.२० एम.सी.एम. पाणीसाठा चारच दिवसात ७०.०२ एम.सी.एम. इतका झालेला आहे. म्हणजेच मोरबे धरणातील जलसाठ्यात १७.८२ एम.सी.एम. इतकी वाढ झालेली आहे.

संततधार पर्जन्यवृष्टीमुळे जलसाठा ३६.६८ टक्के इतका झालेला असल्याने चार दिवसात झालेली ९.३४ टक्के इतकी लक्षणीय वाढ नवी मुंबईकरांना दिलासा देणारी आहे. सद्यस्थितीत ५ डिसेंबर २०२२ पर्यंत पुरेल इतका पाणीसाठा मोरबे धरणात झालेला आहे.

मोरबे धरणाची पाण्याची पातळी ३ जुलै रोजी ६९.८४ मीटर इतकी होती, ती मागील पाच दिवसातील पावसामुळे ७३.१० मीटर इतकी झालेली आहे. ८८ मीटर ही मोरबे धरणात पाणी साठविण्याची कमाल क्षमता असून अशाच प्रकारे पाऊस पडल्यास मागील वर्षीप्रमाणेच यावर्षीही मोरबे धरण संपूर्ण भरेल असे दिसून येत आहे.

### नवी मुंबई पालिकेकडून नागरिकांना आवाहन

*मान्सुनची परिस्थिती लक्षात घेऊन नवी मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही प्रकारची पाणी कपात केली नाही, मात्र पाण्याचे महत्त्व लक्षात घेऊन सुजाण नवी मुंबईकर नागरिकांनी पाणी जपून वापरावे, पाण्याचा अपव्यय करू नये, असे आवाहन महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या वतीने करण्यात येत आहे.*

# आपटा येथे वन्यप्राण्याच्या हल्ल्यात नऊ बकऱ्यांचा मृत्यू



**मोहोपाडा, रसायनी : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाणे हद्दीत आपटा येथे वन्य हिंस्त्र प्राण्याच्या हल्ल्यात नऊ बकऱ्यांचा मृत्यू झाला आहे, तर एक बकरी बेपत्ता आहे. बकरी मालकाने या प्रकरणाची सर्व माहिती रसायनी पोलिसांना दिली असून पुढील तपास सुरू आहे.

आपटा शासकीय आरोग्य केंद्राकडे जाणाऱ्या रस्त्याकडे असलेल्या दर्गा शेजारी आकिब पिट्टू यांचे फार्म हाऊस आहे. येथे त्यांचे बंधू शेळीपालन करतात. रविवारी (दि.१०) सकाळी ७:३० वाजता आपल्या १४ बकऱ्यांना चरायला सोडून पिट्टू ईदच्या निमित्ताने नमाज पठण करण्यासाठी गेले. यादरम्यान हिंस्त्र प्राण्याने १४ पैकी नऊ बकऱ्यांवर हल्ला करून मृत केले व एका बकरीला कर्नाळा अभयारण्याच्या जंगल दिशेने ओढत नेल्याचे दिसून आले आहे. दुपारी ११ नंतर गावातील तरुणाई या परिसरात फिरायला गेल्यानंतर त्यांच्या सदर प्रकार लक्षात आला. त्यांनी पिट्टू यांना सांगताच त्यांनी रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास दादाभाऊ डोंगरे यांना सांगितले.



(छाया : राकेश खराडे)

पोलिसांनी घटनास्थळी भेट देवून वनविभाग व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना कळविले. घटनास्थळी एच. टी. ढाकोल व त्यांच्या पथक तसेच पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी पाहणी केली. कर्नाळा वनपरिमंडळ अधिकारी एच. टी. ढाकोल यांनी संबंधित परिसर हा कर्नाळा अभयारण्याच्या पायथ्याशी असल्याने कोणत्यातरी हिंस्त्र प्राण्याने हा हल्ला केला असावा असा अंदाज वर्तविला आहे. तर हा तरस जातीचा प्राणी असल्याचा अंदाज वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास डोंगरे यांनी वर्तविला आहे. तसेच हा प्राणी एकटा नसून एकाहून अधिक असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले आहे.

साधारणत: घटनेच्या आवारातील पावलांचे ठसे पाहून तरस किंवा बिबट्यासदृश्य इतर कोणतातरी प्राणी असल्याचा प्राथमिक अंदाज वनविभागाकडून वर्तविला जात आहे. या प्रकारामुळे आपटा परिसरातील नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे.

या प्रकरणी पशुधन पर्यवेक्षक आर. बी. चव्हाण अहवाल सादर करणार आहेत. वनरक्षक एस. डी. पाटील, ॲड. संजय टेंबे, सहायक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ बालवडकर आदीसह आपटा ग्रामस्थ उपस्थित होते.

# रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाच्या पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रोटरी वर्ष २०२२-२०२३साठी रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाच्या नवनिर्वाचित अध्यक्ष अमित शहा, मानद सचिव रो. डॉ.धीरज जैन आणि संचालक मंडळ यांचा पदग्रहण समारंभ माँटेरिया रिसॉर्ट, विणेगाव येथे झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रांतपाल मोहन पालेशा आणि सहाय्यक प्रांतपाल अविनाश कोळी उपस्थित होते.

या वेळी रोटरी वर्ष २०२१-२२चे माजी अध्यक्ष गणेश काळे यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष अमित शहा यांना अध्यक्षपदाची सूत्रे, तर माजी सचिव संदीप साबळे यांनी नवनिर्वाचित सचिव डॉ. धीरज जैन याना सचिवपदाची सूत्रे प्रदान केली. अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर केलेल्या आपल्या समयोचित भाषणात अमित शहा यांनी क्लबच्या माध्यमातून करावयाच्या नियोजित समाजसेवी प्रकल्पांचे सादरीकरण केले. डॉ. धीरज जैन यांनी १ जुलैपासून झालेल्या चार प्रकल्पांची माहिती दिली. ज्यात वृक्षारोपण, रक्तदान शिबिर, डॉक्टरांचा सन्मानपत्र देऊन केलेला सत्कार आणि अमितच्या वाढदिवशी मोहोपाड्यातील दोन प्राथमिक शाळांमधील ९५ विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूंच्या संचांचे वाटप करण्यात आल्याच्या प्रकल्पांचा समावेश होता.

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाच्या 'पाताळगंगा फ्लोज' या वार्तापत्राचे प्रकाशन करण्यात आले. ज्याचे संपादन बाळकृष्ण होनावळे व ज्याची निर्मिती माजी अध्यक्ष नागेश कदम यांनी केले. सूत्रसंचालन माजी अध्यक्ष सुनील कुरूप यांनी केले.

# 'रोटरी'तर्फे सांगुर्ली गावात सामाजिक उपक्रम





**खारघर : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ खारघर मिड टाऊनतर्फे पनवेलच्या सांगुर्ली गावात शनिवारी (दि. ९) सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.

या गावाच्या जिल्हा परिषद शाळेमध्ये ५० गरीब विद्यार्थ्यांना वह्या-पुस्तकांचे मोफत वाटप करण्यात आले, तसेच १०० रोपे लावण्यात व वाटण्यात आली. प्रत्येक विद्यार्थ्यांना रोप देऊन त्यांना त्या रोपाचे नाव व त्यांच्या स्वत:चे नाव टाकून लावायला सांगितले.

या वेळी रोटरी खारघर मिड टाऊनतर्फे क्लबचे अध्यक्ष रोटरियन प्रशांत कालान, सर्व्हिस प्रोजेक्ट डायरेक्टर राजेश झिरपे, सेक्रेटरी अनामिका श्रीवास्तव व इतर रोटारियन उपस्थित होते. शाळेचे हेडमास्तर माधवी राजेंद्र दिवेकर, मुलांचे पालक, गावातले काही मान्यवरही उपस्थित होते.



# पनवेलच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये पालखी सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलच्या मार्केट यार्ड येथील न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक माननीय आर. एल. प्रक्षाळे यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी एकादशी निमित्त पालखी सोहळा शनिवारी (दि. ९) झाला.

वारकरी संप्रदाय म्हणजे काय हे भावी पिढीला समजावे म्हणून विशेष विठ्ठल रखुमाई पोशाख, मुलांनी वारकरी पेहराव, मुलींनी नऊवारी साड्या डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन वारकरी संप्रदायाचे दर्शन घडविले. तसेच शाळेच्या आवारात विद्यार्थ्यांनी टाळ, लेझिमच्या तालावर पालखी सोहळा साजरा केला.

# सानपाड्यातील धोकादायक फांद्या कोसळण्याची भीती

## भाजपच्या सुनील कुरकुटेंचे महापालिका आयुक्तांना निवेदन

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा प्र.क्र.२९ व प्र.क्र.३० मध्ये वृक्षांच्या फांद्या वाढल्या आहेत. फांद्यांची छाटणी न झाल्याने या फांद्या कोसळण्याची शक्यता आहे. फांद्यांची छाटणी तातडीने करावी, अशी मागणी माजी 'ड' प्रभाग समिती सदस्य सुनील कुरकुटे यांनी शनिवारी (दि. ९) नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित बांगर यांच्कडे केली आहे.

सानपाडा प्र.क्र.२९ व प्र.क्र.३० येथे मोठ्या प्रमाणात वृक्षांच्या फांदया वाढलेल्या आहेत. पावसाळ्यापूर्वी मोठ्या प्रमाणात वाढलेल्या वृक्षांच्या फांदयाची छाटणी करणे गरजेचे असते, मात्र महापालिकेतील अधिकाऱ्यांच्या उदासीनतेमुळे प्रभागातील वृक्षांच्या फांदयाची अद्याप छाटणी करण्यात आलेली नाही आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू आहेत. त्यामुळे भविष्यात मुसळधार पावसाच्या तडाख्याने येथील वृक्षांच्या फांद्या कोसळून एखादी मोठी जिवितहानी तसेच वित्तहानी होण्याची भीती प्रभागातील स्थानिक रहिवाशांकडून व्यक्त केली जात आहे. याबाबत प्रभागातील स्थानिक रहिवाशांनी सुनिल कुरकुटे यांच्याकडे तक्रारी केल्या. त्यामुळे स्थानिक रहिवाशांच्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रभागात मोठ्या प्रमाणात वाढलेल्या वृक्षांच्या फांद्यांची तत्काळ छाटणी करण्याची मागणी कुरकुटे यांनी महापालिका आयुक्तांकडे पत्रातून केली आहे.

भविष्यात मुसळधार पावसाच्या तडाख्याने वृक्ष तसेच त्याच्या फांदया कोसळून एखाद्याचा जीव गेला तरच महापालिकेला जाग येईल का ? असा प्रश्न कुरकुटे यांनी या वेळी उपस्थित केला आहे. त्यामुळे महापालिकेने मोठ्या प्रमाणात वाढलेल्या वृक्षांच्या फांदयाची छाटणी करण्यास तात्काळ सुरुवात करावी. अन्यथा स्थानिक रहिवाशांना सोबत घेऊन जनआंदोलन छेडण्याचा इशारा कुरकुटे यांनी महापालिका आयुक्तांना पत्रातून दिला आहे.

## कंटनेर ट्रेलरच्या धडकेत मोटरसायकलस्वाराचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

भरधाव कंटनेर ट्रेलरने दिलेल्या धडकेत मोटारसायकल चालकाचा मृत्यू, तर त्याचा सहकारी गंभीर जखमी झाल्याची घटना कळंबोली सर्कल येथे घडली आहे. या अपघातानंतर कळंबोली पोलिसांनी कंटनेर ट्रेलर चालकाला ताब्यात घेतले आहे.

विमलेश रामअवतार शर्मा (४०) असे या अपघातात मृत्यू झालेल्याचे नाव असून राधेश्याम जगदीश (३५) असे जखमीचे नाव आहे. विमलेश आणि राधेश्याम हे दोघे मोटारसायकलवरून जात असताना कळंबोली सर्कल येथे पाठीमागून भरधाव येणाऱ्या कंटेनरने त्यांच्या मोटारसायकलला धडक दिली. यात दोघे गंभीर जखमी झाल्याने दोघांना एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे उपचारादरम्यान, विमलेश याचा मृत्यू झाला. या अपघातानंतर कळंबोली पोलिसांनी कंटेनर ट्रेलर चालक अजय जाधव (२८) याच्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतले आहे.

# नेरूळमध्ये आरोग्य शिबिरास प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ सेक्टर २८ येथील बालाजी कृपा हावरे सोसायटी येथे नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे डेंगू, मलेरिया रोगप्रतिबंधक उपाययोजना प्रशिक्षण शिबिर भरवण्यात आले होते. या वेळी मोफत डेंग्यू मलेरिया रक्त तपासणी सुद्धा करण्यात आली. या शिबिरासाठी भाजपच्या महिला मोर्चाच्या जिल्हा सरचिटणीस मंगल घरत यांनी पाठपुरावा केला होता.



प्रभागातील अनेक सोसायटीच्या अध्यक्ष सेक्रेटरींनी या प्रशिक्षण शिबिराचा लाभ घेतला. बालाजी कृपा हावरे सोसायटीच्या अध्यक्षा अंजनी सैनी आणि सेक्रेटरी सुरेश देसाई साहेब यांनी पुढाकार घेतला होता. प्रभागातील इतर अनेक सोसायटी यांनासुद्धा या शिबिरात सहभागी होऊन होऊन डेंगू मलेरिया सारख्या दुर्लक्षित पण आजाराबद्दल जनजागृती करण्यात आली. अनेक सोसायटयांनी यामध्ये सहभाग नोंदवला, परंतु गुडविल सोसायटीच्या अध्यक्षा वैशाली गीते आणि राज कोठारी स्वतः हजर राहून इतरांना प्रोत्साहित करत होते.

या शिबिरासाठी सुषमा निघोट, सयाजी देसाई, गुजर तसेच नवी मुंबई महापालिका अधिकारी संजय देशमुख आणि आरोग्य विभागाचे इतर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.

# आषाढी एकादशीनिमित्त 'विद्याभवन'ची आरोग्य दिंडी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलाच्या प्राथमिक मराठी विभागाने आषाढी एकादशीनिमित्त सर्व विद्यार्थ्यांच्या सहाय्याने आरोग्य दिंडीचे आयोजन केले.



कोरोनानंतर दोन वर्षांनी नव्या जोमाने शाळेच्या सभागृहात आषाढी एकादशी साजरी करण्यात आली. यावर्षी आषाढी एकादशीचे औचित्य साधून आरोग्य दिंडी काढण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुणे विद्यार्थी गृहाचे संचालक दिनेश मिसाळ उपस्थितीत विठू माऊलीच्या पालखीचे पूजन करण्यात आले. दिंडीसाठी शाळेचे सर्व विद्यार्थी विविध रंगीबेरंगी पारंपारिक वारकरी पोशाखात आले. नेरूळमधील सर्व जनतेने भक्तीभावाने दिंडीचे स्वागत केले.

आरोग्यदिंडीमध्ये विद्यार्थ्यांची वारकरी पथक, आरोग्य सेवक पथक, लेझीम पथक, स्काऊट पथक, तसेच संत मंडळीचे पथक करण्यात आली होती. ढोल ताशांच्या गजरात ही आरोग्यदिंडी पायी चालत विठू नामाचा गजर करत तसेच आरोग्य विषयक घोषणा देत विठ्ठल मंदिराकडे गेली तेथे विठोबा रायाचे दर्शन घेऊन पुन्हा आरोग्य दिंडी शाळेच्या सभागृहात आली. कार्यक्रमात मान्यवरांनी विठू माऊलीची गाणी गाऊन विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला. शेवटी सर्वांना प्रसाद देवून दिंडीची सांगता झाली.


या कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका सुवर्णा मिसाळ, मुख्याध्यापक राजेंद्र ढेरगे,ज्येष्ठ नागरिक ग्रंथालयाचे अध्यक्ष प्रकाश लखापते, माजी विद्यार्थी सुप्रिया देशपांडे तसेच सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिस्तूल बाळगणाऱ्या एकाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

पिस्तूल बाळगणाऱ्या एका व्यक्तीस गुन्हे शाखा कक्ष ३ने अटक केली आहे. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात आरोपी जावेद जाहिद खान यांच्याविरोधात गुहा दाखल करण्यात आला आहे.

खारघर वसाहतीमधील गुरुद्वार ते पापडीचा पाडाकडे जाणाऱ्या रस्त्यावर तळोजा जेल कमानीच्या परिसरातील बस स्टॉप जवळ एकजण बेकायदेशीर पिस्तूल घेऊन येणार असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष ३ चे पोलीस नाईक संजय फुलकर यांना मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी आणि त्यांच्या पथकाने संबंधित ठिकाणी सापळा रचून जावेद जाहिद खान यावर कारवाई केली.



## निवडक

### हिरवळ महाविद्यालयास अमित ठाकरेंची भेट



**माणगाव** : मनविसेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांनी हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी महाड महाविद्यालयाला शनिवारी (दि. ९) भेट देऊन विद्यार्थ्यांना पुढील भविष्यासाठी मार्गदर्शन केले. हिरवळ संस्थेचे पदाधिकारी संतोष बुटाला, प्रदीप शेठ, जय आंबुर्ले, महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. त्यानंतर अमित ठाकरे यांच्या हस्ते महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम, विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

### बकरी ईदनिमित्त रक्तदान

**पाली** : समाजात काही थोडे लोक आपल्या विचारांना कृतीची जोड देतात आणि कृतीतून प्रबोधन घडवितात. पाली येथील नासिर वल्लाद हे इंजिनियर त्यातीलच एक



आहेत. मागील २१ वर्षे बकरी ईदनिमित्त नासिर वल्लाद यांनी रक्तदान केले आहे. नासिर यांच्या घरात बकरी ईदनिमित्त कुर्बानी दिली जात नाही. ईदनिमित्त सर्वधर्मिय बांधव त्यांच्या घरी येतात आणि शुभेच्छा देतात. नासिर हे अपघातग्रस्तांच्या मदतीलादेखील नेहमी धावून येतात. बकरी ईद व्यतिरिक्तही त्यांनी अनेकदा रक्तदान केले आहे. सध्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना रक्तदान करता येत नाही. रक्तदानामुळे अनेकांचे प्राण वाचविल्याचे समाधान मिळत असल्याचे नासिर वल्लाद यांनी प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले.

### सहाय्यक पोलीस निरीक्षकाला धक्काबुक्की

**पेण** : अरूंद रस्त्यावर पार्किंग केलेला टेम्पो काढण्यास सांगितल्याने पेण दादर सागरी पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक गोविंद पाटील यांना धक्काबुक्की केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली आहे. जोहे-दादर रस्त्यावर नवनाथ याने टेम्पो पार्किंग केला होता. सहायक निरीक्षक पाटील यांनी चालक नवनाथ याला टेम्पो रस्त्यातून बाजूला घेण्यास सांगितले, परंतु या गोष्टीचा राग येऊन नवनाथने पाटील यांना शिवीगाळ व धक्काबुक्की करून टेम्पो घेऊन पळून गेला. याप्रकरणी दादर सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

# नांदगाव ते दिघेवाडी पुलाला भगदाड

## ग्रामस्थांकडून दुरूस्तीची मागणी

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील नांदगाव ते दिघेवाडी रस्त्यावरील पुलाची दूरवस्था झाली आहे. या पुलाला मोठे भगदाड पडले आहे. त्यामुळे हा पूल वाहतुकीसाठी धोकादायक झाला असून स्थानिक ग्रामस्थांनी पुलाची पाहणी करून प्रशासनाकडे दुरूस्तीची मागणी केली आहे. हा पूल कमकुवत व धोकादायक झाला असून नागरिकांना जीव मुठीत घेऊन येथून प्रवास करावा लागत आहे.

येथील दिघेवाडी, गोंडाळे, खरबाचीवाडी, हंडेवाडी अशा चार गावांना हा पुल जोडतो. या पुलाला ३८ वर्षे झाली असून अनेक वर्षे याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाले आहे. पावसाळ्या अगोदर या कमकुवत पुलाची डागडुजीदेखील केली नसल्याने या पुलाला मोठे भगदाड पडले असून पूल कमकुवत व धोकादायक बनला असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

**पुलाला भगदाड पडल्याची माहिती ग्रामस्थांनी कळवताच सुधागड तालुका आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी पुलाची पाहणी केली व संबंधित खात्याला याची माहिती दिली.**

**नांदगाव ते दिघेवाडी मार्गावरील हा पूल १९८४ साली बांधण्यात आला असल्याने तेथे नवीन पूल बांधण्यासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. पावसाळा संपल्यानंतर पुलाच्या कामाला सुरुवात करण्यात येईल, तसेच नवीन पूल मंजूर झाला असल्यामुळे या जुन्या पुलाची डागडुजी करता येत नाही.**

**-दिलीप मदने, शाखा अभियंता, सा. बां. विभाग, सुधागड**





(छाया : धम्मशील सावंत)

## पोलादपूर तालुक्यातील ३८ ग्रामपंचायती अंधारात

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यात रात्रीच्या वेळी अतिवृष्टीदरम्यान दरडग्रस्त गावातील रस्त्यावर पथदिवे असण्याची गरज असूनही तालुक्यातील ४२ ग्रामपंचायतींपैकी तब्बल ३८ ग्रामपंचायतींचे पथदिवे विद्युत बिले न भरल्याने बंद असल्याचा अहवाल पंचायत समितीकडून प्राप्त झाला आहे. शासन निर्णयानुसार थेट विद्युत कंपनीला बिलांची रक्कम न देता जिल्हा परिषदेमार्फत बिल अदा करण्याची भूमिका स्पष्ट असूनही महावितरण कंपनीने विद्युत पुरवठा खंडित केला आहे.

महावितरण कंपनीला द्यायची रक्कम जिल्हा परिषदेमार्फत देण्याची शासन निर्णयामध्ये तरतूद केली असताना या देयकांबाबत जिल्हा परिषदेने पंचायत समितीमार्फत ग्रामपंचायतींच्या ग्रामसेवकांकडे अहवाल मागवून देयकाची रक्कम भरण्यासाठी १० टक्के लेखाशिर्ष अनुदान देण्याची व्यवस्था २९ जून २०२२च्या शासन निर्णयातून नमूद करण्यात आली आहे. याकडे जिल्हा परिषदेच्या नियोजनामध्ये प्रशासन काळात दुर्लक्ष झाले आहे. पोलादपूर तालुक्यातील दरडग्रस्त आणि पूरग्रस्त गावांच्या संख्येत यंदा वाढ झाली असताना रात्रीच्या वेळी उद्भवणाऱ्या आपत्ती निवारणासाठी पथदिवे असल्यास बचावकार्याला मदत मिळू शकेल, मात्र गेल्या अनेक महिन्यांपासून पथदिवे बंद असल्याने ग्रामस्थांना रस्त्यावरून चालताना पुराच्या पाण्याचा तसेच दरडी रस्त्यावर आल्याचा अंदाज येत नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

**पोलादपूर पंचायत समितीच्या अहवालानुसार कुडपण, मोरसडे, पैठण आणि बोरघर या केवळ चार ग्रामपंचायतींच्या हद्दीतील पथदिवे सुरू असून उर्वरित ३८ ग्रामपंचायतींमध्ये काळोखाच्या साम्राज्यात अंधारवाटा असल्याचे स्पष्ट झाले आहे. या ३८ ग्रामपंचायतींच्या हद्दीतील ५२ महसुली गावे संभाव्य दरडग्रस्त असून सात गांवे पूरग्रस्तही आहेत. यापैकी केवळ सवाद या ग्रामपंचायतीमध्ये रात्रीच्या वेळी पथदिवे सुरू आहेत.**

## एसटी पासअभावी विद्यार्थ्यांची फरपट

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शाळा सुरू होऊन जवळपास महिना होत आला, मात्र अजूनही रायगड जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांना एसटी सवलत पास मिळालेले नाहीत. पाससाठी लागणारे ओळखपत्र मुंबई मुख्यालयातून छापून न आल्याने विद्यार्थी सवलतीतील पासपासून वंचित आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत असून आर्थि भुर्दंड सहन करावा लागत आहे.

अनेक दिवसांपासून प्रवासी पास मिळविण्यासाठी बस स्थानकात फेऱ्या मारत आहे, मात्र अजूनही प्रवासी पास मिळालेला नाही. परिणामी पासच्या तुलनेत रोजचे तिकीट महाग पडते.

ओळखपत्र नसल्याने पास उपलब्ध होत नाहीत. यासाठी वरिष्ठ कार्यालयात पाठपुरावा करीत आहोत. यातून लवकरच मार्ग काढण्याचा प्रयत्न आहे, असे रायगड विभाग नियंत्रक अनघा बारटक्के यांनी सांगितले.

## माथेरानमधील पेव्हरब्लॉक रस्त्यांची सफाई सुरू

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

माथेरानमध्ये पावसाळ्यात पेव्हरब्लॉकच्या रस्त्यांना शेवाळ येत असल्याने त्यावरून चालणे कठीण होते. यामुळे अपघात होण्याची शक्यतासुद्धा नाकारता येत नाही. म्हणूनच नगरपरिषदेच्या प्रशासक सुरेखा भणगे यांनी आपत्ती व्यवस्थापनाचाच भाग म्हणून आपल्या कर्मचाऱ्यांना सूचना देत पेव्हरब्लॉकच्या रस्त्यांवर ब्लिचिंग पावडर टाकून स्वच्छ करण्यासाठी सुरुवात करण्यात आली आहे.

गावातील ह्या रस्त्यांवर अनेकदा स्थानिक रहिवाशी उन्हाळ्यात कपडे धुतल्यावर वेस्टेज पाणी टाकत असतात, तर काही ठिकाणी काही घरातील सांडपाणीही रस्त्यांवर येत असते. त्यामुळे या रस्त्यांची अवस्था खूपच बिकट होते. उन्हाळ्यात जरी याबाबत काही त्रास जाणवत नसला तरी पावसाळ्यात ह्या रस्त्यांना या वेस्टेज पाण्यामुळे शेवाळ येत असते. त्यामुळे हे पेव्हरब्लॉकचे रस्ते चिकट होऊन त्यावरून घसरून पडण्याची दाट शक्यता असते. यासाठी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक सुरेखा भणगे यांनी विविध भागातील रस्त्यांवर ब्लिचिंग पावडर टाकून ते स्वच्छ करण्यासाठी सुरुवात झाली आहे.



## माणगावात बकरी ईद उत्साहात साजरी

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगाव तालुक्यात बकरी ईद रविवारी (दि. १०) सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली. या ईदनिमित्त मुस्लिम बांधवांनी ईदची मशिदीमध्ये सामुदायिक नमाज अदा केल्यावर आलिंगन देत एकमेकांना बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या.

तालुक्यातील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला, बाजारटेप मोहल्ला, नाणोरे, लोणशी, मोर्बा, साई, निजामपूर, दहिवली कोंड, दहिवली, तारणा, वडवली, मांजरवणे, नांदवी, पुरार, वणी, मलई कोंड, हारकोल, गोरेगाव, टेमपाले, लाखपाले, देवळी, टोळ, टोळ खुर्द आदी गावांतून बकरी ईद उत्साहात साजरी करण्यात आली. गेली दोन वर्षे संपूर्ण देश हा कोरोनाच्या संकटात असल्याने विविध सामाजिक कार्यक्रमाबरोबरच धार्मिक कार्यक्रमांवर शासनाने निर्बंध लादले होते, परंतु यावर्षी कोरोनाचे संकट जवळपास दूर झाल्याने शासनाने निर्बंध उठविल्यावर रमजान ईद मुस्लिम बांधवांनी उत्साहात साजरी केली.

माणगाव नगराध्यक्ष, पोलीस हवालदार प्रशांत पाटील, महिला पोलीस अंमलदार दिपाली मोरे यांनी जुने माणगाव येथे मुस्लिम बांधवांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. या बकरी ईद निमित्त जुने माणगाव मस्जिद मोहल्ला याठिकाणी सकाळी ८ वा. मुस्लिम बांधवांनी बकरी ईदची सामुदायिक नमाज अदा केली. त्यानंतर येथील मौलाना साजिद यांनी कुराण पठण करून बकरी ईदचे महत्त्व सांगितले.

## नागाव हायस्कूलमध्ये आपत्ती व्यवस्थापन मार्गदर्शन

**रेवदंडा : वार्ताहर**

अलिबाग तालुक्यातील नागाव येथील हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे मार्गदर्शन देण्यात आले. या शिबिरात ज्येष्ठ आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ जयपाल पाटील यांनी १५० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी मुख्याध्यापक अजित पाटील, जगदिश थोरवे, चंद्रकांत गिरी, सुप्रिया पाटील, मंजूषा पाटील आदी शिक्षकवर्ग उपस्थित होते. जयपाल पाटील यांनी, रस्त्यावर अनोळखी माणसाच्या वाहनात जाऊ नये, यात्रेत अथवा गर्दीत हरवल्यास पोलीस काका, अथवा पोलीस मावशी यांनाच भेटावे, अनोळखी माणसासोबत जाऊ नये, दप्तरामध्ये घरच्यांचा मोबाईल क्रमांक लिहून ठेवावा, पावसाळ्यात पंप लावण्यासाठी चप्पल घालूनच जावे असे मार्गदर्शन केले. या वेळी विद्यार्थ्यांना रायगडचा युवक फाउंडेशनच्या वतीने सुरक्षा मित्र विकास रणपिसे यांनी मास्कचे वाटप केले.



## कर्जतमधील आगरी समाजातील प्रतिभावंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**कर्जत : बातमीदार**



तालुक्यातील आम्ही आगरी ग्रुपच्या माध्यमातून दहावी आणि बारावीत प्रथम आलेल्या २० विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांना हुतात्मा हिराजी पाटील यांची प्रतिमा भेट दिली असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील अडचणी सोडविणे आणि नोकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आम्ही आगरी ग्रुप काम करीत आहे.

बारावीमध्ये सायली म्हात्रे, मुक्ता मसणे, मंदिरा म्हसकर, साक्षी वेहले, अक्षय ऐनकर, जागृती कराळे, भाग्यश्री हिलाल तर दहावीमध्ये पूर्वा मोरगे, तेजल घारे, रिंकू खरमरे, पायल मुने, सुमित सोनावळे, भावेश ऐनकर, कुणाल चवळे, दीक्षा राणे, तेजस्विनी राणे, काजल विरले, नेत्रा मसने, पूजा अरविंद कालेकर, वेदिका शेळके भाग्यश्री खाडे यांचा त्यांच्या घरी जाऊन सत्कार करण्यात आला. मुंबई येथील सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌मध्ये डिग्री मिळविणारी रोविना पाटील हिचाही सत्कार या वेळी करण्यात आला.

आम्ही आगरी ग्रुपचे संतोष पेरणे, केशव मुने, मनीषा दळवी, अंकुश शेळके, अंकुश दुर्गे, मिलिंद विरले, संदीप म्हसकर, संतोष धुळे, मनोहर हजारे, विलास डुकरे, किशोर घारे, समीर मसने, सज्जन गवळी, गोपीनाथ राणे, कैलास विरले, संदीप मसणे, हरेश सोनावळे, अशोक कराळे, समीर भोईर, जयेश कालेकर आदींसह इतर सदस्य उपस्थित होते.

## पोलादपुरातील क्षेत्रपाळ येथे खेकडा पालन व्यवसाय

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील निसर्गाच्या सान्निध्यातील व्यवसाय उपजीविकेचे साधन ठरू शकेल. अशा प्रकारचे प्रायोगिक व्यवसाय स्थानिक तरूणांनी शोधून झोकून देत मेहनत केल्यास नोकरीनिमित्त शहरांच्या आश्रयाला जाऊन गावातील शेतजमिनी ओसाड करण्याची आवश्यकता राहणार नसल्याचे मत क्षेत्रपाळ येथील प्रमोद आणि सुशील प्रकाश पार्टे यांनी व्यक्त केले. दोघा सख्खा भावंडांनी कोरोना काळात वडील गमावले, मात्र त्यांच्या विम्याच्या थोड्या फार पैशातून खेकडा पालन व्यवसाय उभा केल्याचे सांगून तालुकावासियांना या व्यवसायाचे नियमित ग्राहक होण्याचे आवाहन केले आहे.

क्षेत्रपाळच्या खेकडा पालन केंद्रामध्ये लाल पंजा किरवी, मुठे, मुरे, चिंबोरी या खेकड्याच्या प्रजाती असून त्याचा आकार हिरव्या मातीच्या खेकड्यापेक्षा लहान आहे. या खेकड्याची जास्तीत जास्त १३ सेमीपर्यंत वाढ होते आणि याचे वजन एक किलो २०० ग्रॅमपर्यंत वाढते. या प्रजातीच्या खेकड्याला मातीमध्ये बुजवून घेण्याची सवय असल्यामुळे त्याच्या अंगावर बहूभुज खुणा आढळतात. हॉटेल व्यवसायामध्ये तसेच कोकणासह पश्चिम महाराष्ट्रामध्ये या खेकड्यांना मोठी मागणी असल्यामुळे बाजारभाव ही चांगला मिळत असतो, अशी माहिती देऊन प्रमोद पार्टे यांनी या खेकडा पालन केंद्रातील खेकड्याचे मानवी शरीराला लाभ खूप असल्याची माहिती दिली.



**खेकड्यांच्या शरीरामध्ये मिनरलचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे आपल्या शरीरातील ऑक्सिडंटमुळे होणारे नुकसान कमी होण्यास मदत होते. हार्टअ‍ॅटॅकचा धोका कमी होतो. रक्तातील कोलेस्टेरॉल प्रमाण कमी होण्यास मदत होते. रोगप्रतिकार शक्ती वाढते. सर्दी, खोकला, छातीमध्ये कफ झाला असेल तर याचा त्रास लगेच कमी होतो. खेकड्याचे सेवन प्रोटीन मिळवण्यासाठी चांगले आहे. ॲनिमियाचा धोका कमी होतो. वजन कमी करण्यास खेकडा फायदेशीर आहे. गुडघे आणि सांधेदुखी याच्या उपचारासाठी त्याचे सेवन केले जाते. रक्तदाबही नियंत्रित राहतो.**

## इनरव्हील क्लब ऑफ कर्जतच्या अध्यक्षपदी उत्तरा वैद्य यांची निवड

**कर्जत : प्रतिनिधी**



इनरव्हील क्लब ऑफ कर्जतच्या नवीन २०२२-२३ वर्षाकरीता पदग्रहण सोहळा नुकताच झाला. क्लबच्या अध्यक्षपदी उत्तरा वैद्य यांची निवड करण्यात आली. या वेळी व्यासपीठावर डिस्ट्रिक्ट ईएसओ डॉ. शोभना पालेकर, पनवेल इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा संजीवनी मालवणकर, कर्जतचे सीए विक्रम वैद्य उपस्थित होते.

प्रारंभी दीपप्रज्वलन करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. आरती भोसले यांच्या नृत्याने पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. माजी क्लबच्या कमिटीने मागील वर्षाची अहवाल सादर केला. त्यानंतर नवनिर्वाचित अध्यक्ष म्हणून उत्तरा वैद्य, उपाध्यक्षा वनिता सोनी, सचिव मोनिका बडेकर, खजिनदार अवंतिका गायकर, एडिटर ज्योत्स्ना शिंदे, आयएसओ प्राची चौडीए, सीसी शिल्पा दगडे, आयपीपी करुणा पराडकर यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्षा उत्तरा वैद्य यांनी नवीन वर्षाचे संकल्प सभासदांसमोर मांडले. डिस्ट्रिक्ट ईएसओ डॉ. शोभना पालेकर यांनी सर्वांनी मिळून ताकदीने कार्य करण्यावर भर द्या, असे सांगितले. सीए. विक्रम वैद्य यांनी क्लब पाच वर्षे आदिवासी वाड्यापाड्यात जाऊन त्यांच्या गरजा जाणून त्यांच्यासाठी उपयुक्त उपक्रम राबवित आहे. म्हणून क्लबसाठी एक लाखांची देणगी दिली. या कार्यक्रमात संजीवनी घुमरे, उज्वला पाटील, आशा ठोंबरे, शितल पाटील यांनी नव्याने सदस्यत्व स्वीकारले आहे.

कार्यक्रमासाठी तन्वी जोशी, पल्लवी सावंत, सुलोचना गायकवाड, सरस्वती चौधरी, शिला गुप्ता, साक्षी अडसुळे, दिपा देशमुख, वैशाली दांडेकर, कश्यपी ठक्कर, भाग्यश्री शेळके, कीर्ती जोशी, सुप्रिया गिरी आदी उपस्थित होत्या.

# भारताची विजयी आघाडी

## दुसऱ्या सामन्यात इंग्लंडवर ४९ धावांनी मात

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

रवींद्र जडेजाच्या (२९ चेंडूंत नाबाद ४६ धावा) फटकेबाजीनंतर गोलंदाजांनी केलेल्या सांघिक कामगिरीच्या जोरावर भारताने शनिवारी (दि. ९) दुसऱ्या ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यात इंग्लंडवर ४९ धावांनी मात केली. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या या मालिकेत २-० अशी विजयी आघाडी मिळवली आहे.




बर्मिंगहॅम येथे झालेल्या दुसऱ्या सामन्यात भारताने दिलेल्या १७१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना इंग्लंडचा संघ १७ षटकांत १२१ धावांत गारद झाला. भुवनेश्वर कुमारने वैयक्तिक पहिल्या दोन षटकांत जेसन रॉय (०) आणि कर्णधार जोस बटलर (४) यांना माघारी पाठवले. यातून इंग्लंडचा संघ अखेरपर्यंत सावरू शकला नाही. मोईल अली (२१ चेंडूंत ३५) आणि डेव्हिड विली (२२ चेंडूंत नाबाद ३३) यांचा अपवाद वगळता इंग्लंडच्या एकाही फलंदाजाला २० धावांचा टप्पा ओलांडता आला नाही. भारताकडून भुवनेश्वर (३/१५), जसप्रित बुमरा (२/१०), यजुवेंद्र चहल (२/१०), हार्दिक पांड्या (१/२९) आणि हर्षल पटेल (१/३४) यांनी बळी मिळवले.

तत्पूर्वी भारताने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ८ बाद १७० अशी धावसंख्या उभारली. कर्णधार रोहित शर्मा (२० चेंडूंत ३१) आणि ऋषभ पंत (१५ चेंडूंत २६) या सलामीवीरांनी भारताच्या डावाची आक्रमक सुरुवात केली. त्यांनी ४.५ षटकांतच ४९ धावांची सलामी दिल्यावर रोहितला पदार्पणवीर रिचर्ड ग्लीसनने बाद केले. ग्लीसननेच मग पंत आणि विराट कोहली (१) यांनाही माघारी पाठवले, मात्र जडेजाने अखेरच्या षटकांत पाच चौकारांच्या मदतीने नाबाद ४६ धावा करीत भारताला सावरले.

**संक्षिप्त धावफलक**

भारत : २० षटकांत ८ बाद १७० (रवींद्र जडेजा नाबाद ४६, रोहित शर्मा ३१; ख्रिस जॉर्डन ४/२७, रिचर्ड ग्लीसन ३/१५) विजयी वि. इंग्लंड : १७ षटकांत सर्वबाद १२१ (मोईन अली ३५; भुवनेश्वर कुमार ३/१५, जसप्रित बुमरा २/१०, यजुर्वेद्र चहल २/१०) सामनावीर : भुवनेश्वर कुमार.

# विम्बल्डन टेनिस स्पर्धेत रायबाकिनाला ऐतिहासिक जेतेपद

## महिला एकेरीच्या अंतिम लढतीत जाबेऊरचा पराभव



**लंडन : वृत्तसंस्था**

रशियाची माजी खेळाडू आणि आता कझाकस्तानचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एलिना रायबाकिनाने ऐतिहासिक अधिराज्य गाजवताना विम्बल्डन टेनिस स्पर्धेचे जेतेपद पटकावले. महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात तिने पिछाडीवरून तिसऱ्या मानांकित ट्युनिशियाच्या ओन्स जाबेऊरला पराभवाचा धक्का देत पहिल्या ग्रँडस्लॅम जेतेपदावर कब्जा केला. ग्रँडस्लॅम स्पर्धा जिंकणारी ती कझाकस्तानची पहिली टेनिसपटू ठरली.

रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या विम्बल्डनमध्ये रशिया आणि बेलारूसच्या खेळाडूंवर बंदी घालण्यात आली होती, मात्र २०१८पासून रशियन रायबाकिना कझाकस्तानचे प्रतिनिधित्व करीत असल्याने तिला यंदाच्या स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळाली आणि तिने या संधीचे सोने केले. ग्रँडस्लॅम स्पर्धेची अंतिम फेरी गाठणारी पहिली अरब खेळाडू जाबेऊरने मात्र निराशाजनक खेळ केला. गेल्या ६० वर्षांत प्रथमच एकाही ग्रँडस्लम स्पर्धेचा अंतिम सामना न खेळलेल्या दोन महिला खेळाडूंमध्ये जेतेपदाची लढत झाली.

सेंटर कोर्टवर झालेल्या अंतिम सामन्यात १७व्या मानांकित रायबाकिनाने ३-६, ६-२, ६-२ अशा फरकाने बाजी मारली. जाबेऊरने अपेक्षेप्रमाणे या सामन्याची आक्रमक सुरुवात केली. पहिल्या सेटमध्ये १-१ अशी बरोबरी असताना जाबेऊरने रायबाकिनाची सर्व्हिस तोडत २-१ अशी महत्त्वपूर्ण आघाडी मिळवली. यानंतर दोन्ही खेळाडूंना आपली सर्व्हिस राखण्यात यश आले, मात्र अखेर ५-३ अशी आघाडी असताना जाबेऊरने पुन्हा रायबाकिनाची सर्व्हिस भेदत पहिला सेट ६-३ असा आपल्या नावे केला.

दुसऱ्या सेटमध्ये रायबाकिनाने हार न मानण्याच्या वृत्तीचे दर्शन घडवले. तिने पहिल्याच गेममध्ये जाबेऊरची सर्व्हिस तोडली. यानंतर तिने जाबेऊरला पुनरागमनाची कोणतीही संधी दिली नाही. तिने हा सेट ६-२ अशा मोठ्या फरकाने जिंकत सामन्यात बरोबरी साधली. तिसऱ्या सेटमध्येही रायबाकिनाने दमदार खेळ केला.

### रायबाकिनाचा विक्रम

ग्रँडस्लॅम स्पर्धा जिंकणारी रायबाकिना ही कझाकस्तानची पहिली टेनिसपटू आहे. विम्बल्डन स्पर्धा जिंकणारी २३ वर्षीय रायबाकिना ही गेल्या ११ वर्षांतील सर्वांत युवा महिला टेनिसपटू ठरली आहे. २०११मध्ये चेक प्रजासत्ताकच्या पेट्रा क्विटोव्हाने वयाच्या २१व्या वर्षी विम्बल्डनचे जेतेपद मिळवले होते. याशिवाय विम्बल्डन स्पर्धेला सलग पाचव्यांदा नवविजेती मिळाली आहे. यापूर्वीच्या चार पर्वांत गार्बिने मुगुरुझा (२०१७), अँजेलिक कर्बर (२०१८), सिमोना हालेप (२०१९) आणि अॅश्ले बार्टी (२०२१) या टेनिसपटूंनी महिला एकेरीचे जेतेपद पटकावले होते. कोरोनाच्या कारणास्तव २०२०मध्ये ही स्पर्धा खेळवण्यात आली नव्हती.

# पंत-रोहितचा व्हिडीओ व्हायरल



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने तीन सामन्यांच्या मालिकेतील दुसऱ्या ट्वेन्टी-२० क्रिकेट सामन्यात इंग्लंडवर मात करून २-० अशी विजयी आघाडी मिळवली आहे. या सामन्यात इशान किशन बाद झाला आणि ऋषभ पंतला मधल्या फळीत चांगली कामगिरी करता येत नव्हती. याच कारणामुळे तो रोहित शर्मासोबत ओपनिंगला आला आणि काही चेंडूंनंतर तो चिडलेला दिसत होता. या वेळी पंत आणि रोहितमध्ये झालेल्या संवादाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

पहिल्याच षटकातील तिसरा चेंडू ऋषभ पंत खेळायला आला तेव्हा तो एका धावेसाठी धावला, पण गोलंदाज त्याच्या धावण्याच्या मध्ये आला, मात्र पंतने कोणताही त्रास न होता धाव पूर्ण केली, कारण थ्रो स्टंपला लागला नाही. यामुळे पंत थोडा नाराज झाला आणि त्याने कर्णधार रोहित शर्माला सांगितले की, अरे यार, हा समोर आला होता. टक्कर मारू का? यावर रोहित म्हणाला, हो, मार.

पंत आणि रोहितचा हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. रोहित शर्मासह ऋषभ पंत पहिल्यांदाच टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सलामीला मैदानात उतरले होता, कारण संघ व्यवस्थापनाला सुरुवातीला उजव्या आणि डाव्या हाताची जोडी हवी होती. या दोघांची जोडी ४९ धावांपर्यंत मैदानात टिकली. रोहित ३१ धावा करून बाद झाला, तर पंतने २६ धावांची खेळी खेळली.



# दुसऱ्या कसोटीत श्रीलंकेचा ऑस्ट्रेलियावर विजय

**गॉल : वृत्तसंस्था**

कर्णधार दिमुथ करुणरत्ने (१६५ चेंडूंत ८६ धावा) आणि कुशल मेंडिस (१५२ चेंडूंत नाबाद ८४) यांच्या अर्धशतकांच्या बळावर यजमान श्रीलंकेने दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियाला चोख प्रत्युत्तर दिले.

श्रीलंकेची दुसऱ्या दिवसअखेर २ बाद १८४ अशी धावसंख्या होती आणि ते १८० धावांनी पिछाडीवर होते. करुणरत्ने आणि मेंडिस यांनी दुसऱ्या गड्यासाठी १५२ धावांची महत्त्वपूणर भागीदारी रचली. तत्पूर्वी ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव ३६४ धावांवर संपुष्टात आला. स्टीव्ह स्मिथ १४५ धावांवर नाबाद राहिला, मात्र त्याला तळाच्या फलंदाजांची फारशी साथ लाभली नाही. श्रीलंकेकडून डावखुरा फिरकीपटू प्रभात जयसूर्याने सहा बळी मिळवले.

# नदालच्या टेनिस भवितव्यावर प्रश्नचिन्ह

**लंडन : वृत्तसंस्था**


गेल्या महिन्यात स्पेनचा तारांकित टेनिसपटू राफेल नदालने फ्रेंच खुली स्पर्धा जिंकत कारकीर्दीतील २२व्या ग्रँडस्लॅम जेतेपदावर कब्जा केला होता. त्या वेळी डाव्या पायाच्या दुखापतीमुळे विम्बल्डन स्पर्धेत खेळण्याबाबत त्याने साशंकता व्यक्त केली होती, पण नदाल विम्बल्डनमध्ये खेळला आणि उपांत्य फेरीचा टप्पाही गाठला, मात्र स्नायूंच्या दुखापतीमुळे त्याला उपांत्य फेरीच्या सामन्यातून माघात घ्यावी लागली.

नदालला गेल्या काही वर्षांपासून विविध दुखापतींनी सतावले आहे. या दुखापतींना मागे सारत टेनिस कोर्टवर दमदार पुनरागमन करण्यात नदालला यश आले होते, मात्र कारकीर्दीच्या अखेरच्या टप्प्यावर असलेल्या नदालला आता दुखापतीतून सावरण्यासाठी आधीपेक्षा अधिक कालावधी लागू शकेल. त्यामुळे फेडररप्रमाणेच नदालचे भविष्य प्रश्नांकित आहे.

# मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेतील भारताचे आव्हान संपुष्टात

**क्वालालम्पूर : वृत्तसंस्था**

भारताचा तारांकित बॅडमिंटनपटू एचएस प्रणॉयची मलेशिया मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेमधील विजयी घोडदौड शनिवारी (दि. ९) हाँगकाँगच्या एनजी का लाँग अँगसने रोखली. पुरुष एकेरीच्या तीन गेमपर्यंत रंगलेल्या उपांत्य सामन्यात प्रणॉयने निसटता पराभव पत्करला.



**उपांत्य सामन्यात प्रणॉय पराभूत**

प्रणॉयने पहिला गेम जिंकत आशा निर्माण केली, पण अँगसने नंतर सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेतली. प्रणॉयने एक तास आणि चार मिनिटे झुंज दिल्यानंतर २१-१७, ९-२१, १७-२१ अशा फरकाने सामना गमावला.

याआधीच्या आठ सामन्यांपैकी दोघांनी प्रत्येकी चार जिंकले होते. यापैकी अखेरचे तीन सामने जिंकणाऱ्या प्रणॉयचे पारडे जड मानले जात होते, पण अँगसने या विजयानिशी सरशी साधली. शुक्रवारी पी. व्ही. सिंधूचे आव्हान उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आले होते. आता प्रणॉयच्या पराभवानिशी भारताचे या स्पर्धेमधील आव्हान संपुष्टात आले.

# भारत-पाक सामना तीन महिने आधीच 'हाऊसफुल्ल'

**मुंबई : प्रतिनिधी**




या वर्षी होणाऱ्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत कट्टर पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेले भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ आमनेसामने येणार आहेत. या सामन्याच्या तिकिटांसाठी चाहत्यांमध्ये जोरदार स्पर्धा होती आणि तीन महिने आधीच सर्व तिकीट विकली गेल्याचे दिसून आले.

भारत विरुद्ध पाकिस्तान या सामन्यासाठी चाहतावर्ग प्रचंड उत्सुक असतो. यंदा दिवाळीच्या एक दिवस आधी म्हणजे २३ ऑक्टोबरला हा सामना होणार आहे. या सामन्याच्या तीन महिने आधीच जवळपास सर्व तिकिटे विकली गेली आहेत. हा सामना 'हाऊसफुल्ल' झाल्याचे टुरिझम ऑस्ट्रेलिया (पर्यटन विभाग) आणि इतर अनेक ट्रॅव्हल एजंटकडून सांगण्यात आले.

यंदा ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये ऑस्ट्रेलियात टी-२० विश्वचषक खेळवला जाणार आहे. १६ ऑक्टोबरपासून स्पर्धेला सुरुवात होणार असून अंतिम लढत १३ नोव्हेंबरला होणार आहे. भारत-पाक सामन्याप्रमाणेच फायनलची तिकिटेही जवळपास पूर्ण विकली गेल्याचे सांगण्यात आले आहे.

भारत आणि पाकिस्तान संघ या स्पर्धेतील आपला पहिला सामना एकमेकांविरुद्ध खेळणार आहेत. हा सामना २३ ऑक्टोबर रोजी मेलबर्न क्रिकेट मैदानावर होणार आहे. याआधी हे दोन्ही संघ आणखी एक सामना खेळणार आहेत. हा सामना आशिया कप अंतर्गत खेळवला जाणार आहे.

# रोहित शर्माचे टी-२०मध्ये चौकारांचे त्रिशतक

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय कर्णधार रोहित शर्माने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एक मोठी कामगिरी केली आहे. हिटमॅनने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ३०० चौकार पूर्ण केले आहेत. ही कामगिरी करणारा तो जगातील दुसरा आणि भारतातील पहिला फलंदाज बनला आहे. रोहितच्या आधी आयर्लंडच्या पॉल स्टर्लिंगने ही कामगिरी केली आहे.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com